# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक १९-०३-२०१८ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

दिनांक १९ मार्च २०१८ रोजी (का.प.क्र.०९) मा.महापौर श्री.नंदकुमार राधाकिसन घोडेले यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे सकाळी ११.४५ वा. वंदेमातरम् या गीताने सुरू झाली. सभेला मा.आयुक्त श्री.नवल किशोर राम, भाप्रसे नगर सचिव श्री डी.डी.सुर्यवंशी व संबंधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १. | स.स. श्री.विजय साईनाथ औताडे |
| २. | स.स. श्री.गजानन रामकिसन बारवाल |
| ३. | स.स. श्री.विकास रतनलाल जैन |
| ४. | स.स. श्री.खान फेरोज मोईनुद्दीन |
| ५. | स.स. श्री.बमणे पुनमचंद सोनाजी |
| ६. | स.स. श्री.जाधव बन्सी ग्यानू |
| ७. | स.स. श्री.वाघमारे रुपचंद लक्ष्मण |
| ८. | स.स. श्रीमती ज्योती जयेश अभंग |
| ९. | स.स. श्री.राजगौरव हरिदास वानखेडे |
| १०. | स.स. श्रीमती रोजतकर पुष्पा उत्तमराव |
| ११. | स.स. श्री.सुरे सीताराम इसराम |
| १२. | स.स. श्रीमती स्वाती किशोर नागरे |
| १३. | स.स. श्री.मोहन धन्नुलाल मेघावाले |
| १४. | स.स. श्री.खान अय्युब म.हुसेन खान |
| १५. | स.स. श्री.सचिन सुर्यकांत खैरे |
| १६. | स.स. श्री.शेजवळ सुभाष सयाजी |
| १७. | स.स. श्री.रावसाहेब राधाकिसन आमले |
| १८. | स.स. श्रीमती लोखंडे मनिषा विनोद |
| १९. | स.स. श्रीमती दाभाडे प्रेमलता मिलींद |
| २०. | स.स. श्री.अफसर खॉन यासीन खॉ |
| २१. | स.स. श्री.कादरी जमीर अहेमद रहीम अहेमद |
| २२. | स.स. श्री.सय्यद मतीन रशीद |
| २३. | स.स. श्रीमती तसनीम बेगम अ.रऊफ |
| २४. | स.स. श्रीमती खान सायरा बानो अजमल |
| २५. | स.स. श्रीमती सय्यद सरवत बेगम आरेफ हुसैनी |
| २६. | स.स. श्री.सिद्दीकी नासेर तकीउद्दीन |

| | |
|---|---|
| २७. | स.स. श्रीमती शेख नरगीस सलिम |
| २८. | स.स. श्री.खान जहांगीर मुलानी |
| २९. | स.स. श्रीमती खरात सिमा गणपत |
| ३०. | स.स. श्रीमती शोभा नारायणराव वळसे |
| ३१. | स.स. श्री.चित्ते नितीन रमन |
| ३२. | स.स. श्रीमती ज्योती सुभाष पिंजरकर |
| ३३. | स.स. श्रीमती शबनम बेगम कलीम कुरेशी |
| ३४. | स.स. श्रीमती संगिता सुभाष वाघुले |
| ३५. | स.स. श्री.मलके गोकुलसिंग संपतसिंग |
| ३६. | स.स. श्रीमती सुरेखा बाळासाहेब सानप |
| ३७. | स.स. श्रीमती वैशाली कारभारी जाधव |
| ३८. | स.स. श्री.शिंदे राजु रामराव |
| ३९. | स.स. श्री.मकरंद माधवराव कुलकर्णी |
| ४०. | स.स. श्री.खान इरशाद इब्राहिम |
| ४१. | स.स. श्रीमती नसीम बी सांडु खॉ |
| ४२. | स.स. श्री.अजीम अहेमद रफीक |
| ४३. | स.स. श्रीमती साजेदा फारुखी सईद फारुखी |
| ४४. | स.स. श्रीमती खतीजा कुरैशी छोटू कुरैशी |
| ४५. | स.स. श्री.ढगे गंगाधर नामदेव |
| ४६. | स.स. श्रीमती किर्ती महेंद्र शिंदे |
| ४७. | स.स. श्रीमती चावरीया बबीता विजय |
| ४८. | स.स. श्री.भादवे रामेश्वर बाबुराव |
| ४९. | स.स. श्री.बल्लाळ मनोज आसाराम |
| ५०. | स.स. श्रीमती मलेका बेगम हबीब कुरैशी |
| ५१. | स.स. श्रीमती शेख समिना शेख इलियास |
| ५२. | स.स. श्रीमती  पठाण अस्मा फिरदोस रफीक पठाण |
| ५३. | स.स. श्री.जायभाय रमेश भानुदास |
| ५४. | स.स. श्री.शेख जफर अखतर |
| ५५. | स.स.श्री.जागीरदार मोहम्मद अय्युब गुलाम जिलानी |
| ५६. | स.स. श्री.नाईकवाडी अब्दुल रहीम शेख |
| ५७. | स.स. श्री.दांडगे शिवाजी भाऊसाहेब |
| ५८. | स.स. श्रीमती देसरडा राखी प्रशांत |
| ५९. | स.स. श्री.खैरे ऋषिकेश चंद्रकांत |
| ६०. | स.स. श्रीमती रेशमा अशफाक कुरेशी |
| ६१. | स.स. श्रीमती बोर्डे सरीता अरुण |
| ६२. | स.स. श्रीमती वाडकर शिल्पाराणी सागर |
| ६३. | स.स. श्रीमती बनकर विजया संजय |

| | |
|---|---|
| ६४. | स.स. श्री.साळवी नितीन दशरथ |
| ६५. | स.स. श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे |
| ६६. | स.स. श्रीमती कुलकर्णी जयश्री सुरेंद्र |
| ६७. | स.स. श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत |
| ६८. | स.स. श्री.मनगटे गजानन भानुदास |
| ६९. | स.स. श्रीमती देशमुख माधुरी मिलींद |
| ७०. | स.स. श्री.जगताप भाऊसाहेब उत्तमराव |
| ७१. | स.स. श्री.जगताप कमलाकर शामराव |
| ७२. | स.स. श्रीमती चव्हाण सुनिता रामराव |
| ७३. | स.स. श्री.गांगवे मनोज बन्सीलाल |
| ७४. | स.स. श्रीमती ज्योती सुनिल नाडे |
| ७५. | स.स. श्रीमती साळवे अनिता मोहन |
| ७६. | स.स. श्रीमती मुंढे मनिषा बाळासाहेब |
| ७७. | स.स. श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड |
| ७८. | स.स. श्रीमती मिना रामदास गायके |
| ७९. | स.स. श्री.पवार आत्माराम माणिकराव |
| ८०. | स.स. श्रीमती मोरे ज्योती राजाराम |
| ८१. | स.स. श्रीमती चक्रनारायण सीमा काहानुलाल |
| ८२. | स.स. श्री.थोरात दिलीप गंगाधर |
| ८३. | स.स. श्रीमती अर्चना शैलेंद्र निळकंठ |
| ८४. | स.स. श्रीमती सुमित्रा गिरीजाराम हाळनोर |
| ८५. | स.स. श्रीमती निकाळजे लता मगन |
| ८६. | स.स. श्री.सोनवणे राहुल पंढरीनाथ |
| ८७. | स.स. श्री.सिद्धांत संजय शिरसाट |
| ८८. | स.स. श्री.अब्दुल मं.नाविद अब्दुल रशीद |
| ८९. | स.स. श्रीमती विमल जनार्धन कांबळे |
| ९०. | स.स. श्रीमती शोभा गरुलिंगअप्पा बुरांडे |
| ९१. | स.स. श्रीमती स्मिता दिगंबर घोगरे |
| ९२. | स.स. श्री.जंजाळ राजेंद्र हिम्मतराव |
| ९३. | स.स. श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण |
| ९४. | स.स. श्री.अप्पासाहेब विनायक हिवाळे |
| ९५. | स.स. कु.जमादार सायली भागवत |

**नामनिर्देशित पालिका सदस्यांची नावे**

१. श्री.शेख अब्दुल ताहेर अब्दुल करीम
२. श्री.घोडके कचरु छगनराव
३. श्रीमती आऊलवार सुनिता तुकाराम

(या वेळी महाराष्ट्र राज्याचे माजी मा.मंत्री महोदय श्री.पंतगरावजी कदम यांचे दु:खद निधन झाल्याने त्यांना सभागृहाच्या वतीने दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.)

मा.महापौर :मनपाचे मा.आयुक्त श्री.डी.एम.मुगळीकर यांची बदली झाली आहे. त्यांचा चार्ज मा.जिल्हाधिकारी यांचेकडे आहे. ते आज सभेला उपस्थित आहेत. शहरात कचऱ्या संदर्भात जो प्रश्न निर्माण झाला. त्या विषयी अगोदर चर्चा करावी.

श्री.गंगाधर ढगे :प्रभाग एक व प्रभाग तीन मधील कचरा का उचलला जात नाही? मनपाच्या बाजूला कचऱ्याचे ढिगार पडलेले आहे. योग्य नियोजन करावे. कचरा उचलावा.

श्री.रावसाहेब आमले :नागरीकांना मारहाण करून मिटमिटा भागात जेथे कचरा टाकला अशा कचऱ्यावर काय प्रोसेस केली? संबंधीतांवर काय कार्यवाही केली? मिटमिटा येथे जो प्रकार घडला, त्यास मनपा आयुक्त व श्री.सिकंदर अली हे जबाबदार आहे. कारण ज्या गाड्या जाळल्या त्या आपल्याच कर्मचाऱ्यांनी जाळल्या. त्याचे फोटो आहे. १००-१५० महिलांना घरात घुसून पोलीसांनी मारले. हा प्रकार कोणामुळे झाला? मारहाण करून त्याच लोकांवर ३०७ चा गुन्हा दाखल झाला. गट नं. ५४ मध्ये कचरा का टाकता? म्हणून विचारले असता, करारनामा केला असे सांगण्यात आले. हे सत्य आहे का? कोणी करारनामा करून दिला. जे दोषी आहे कार्यवाही करावी.

श्री.नासेर सिध्दीकी :कचरा टाकण्यास प्रत्येक ठिकाणी विरोध होतो. प्रभाग क्रमांक १, ३ मधील कचरा त्या भागात डम्प का होत आहे?

श्री.राजगौरव वानखेडे :प्रभाग क्रमांक १, २, ३ मध्ये जास्त समस्या आहे. इतर वार्डात जसा ओला सुका कचरा वेगळा केला. त्याप्रमाणे ज्या भागात वेगळा कचरा होत नाही. तेथील नागरीकांना लोकप्रतिनिधी, स.सदस्य यांनी सहकार्य करावे. जुन्या शहरात काही ठिकाणी जागा नाही. अशा ठिकाणी ३-४ वार्डाचा मिळून कचरा डम्प करावा. प्रोसेसींग करावे.

श्रीमती किर्ती शिंदे :झोन क्र.२ मध्ये कचऱ्याचे काय नियोजन केले? स्वच्छता निरीक्षक जबाबदारीने काम करीत आहे. त्यांना प्रमोशन द्यावे.

श्री.आत्माराम पवार :जेथे कचरा टाकण्यास विरोध होत आहे. प्रशासनाने यंत्रणा उभी करावी.

श्री.जहागीर खान :शहराच्या बाजूला खदानी आहे तेथे कचरा डम्पींग करावा. तातडीने निर्णय घ्यावा. कचरा जमा होऊन आरोग्याचा प्रश्न निर्माण होऊ शकतो.

श्री.राजू शिंदे :कचरा संदर्भात मनपा प्रशासन व मा.जिल्हाधिकारी विभागाकडून काय कार्यवाही होत आहे? हा प्रश्न सोडविणेसाठी सदस्यांचे काय सहकार्य लागणार आहे?

श्री.त्र्यंबक तुपे :एक महिन्यापासून कचरा कोंडी होते. जेथे कचरा साचला. जागा उपलब्ध आहे. त्यावर प्रोसेसींग होणे आवश्यक आहे. युनीट बसविणे, त्या त्या ठिकाणी विल्हेवाट लावणे महत्वाचे वाटते. काय केले पाहिजे? व प्रशासनाचे मत काय आहे? मिटमिटा येथे प्रकरण घडले, परंतु कचरा बाहेर नेऊन टाकणेही गरजेचे होते. कचरा डम्प किती दिवस करू शकतो? जेथे डम्प करतो तेथे पाणी दुषीत होऊ शकते. तात्पुरता उपाय न करता कायम स्वरूपी उपाय योजना करावी. काही वार्डात जागा नाही. नारेगाव प्रश्न निर्माण झाला. तीन महिने झाले मुदत

दिली होती. तेथे सत्यम एजन्सीच्या माध्यमातून प्रोसेसींग केले होते. तो प्रोजेक्ट बंद पडला. आता तीन महिन्यात काय केले? प्रशासनातील प्रमुख अधिकारी यांचेकडे कामे द्यावे. कर्मचारी यांना हॅण्ड-ग्लोज, बुट व इतर साहित्य द्यावे. त्यांच्या आरोग्यासाठी काळजी घ्यावी. जेथे जागा आहे तेथे युनीट सुरू करावे. नागरीक कचरा वेगळा करतात. परंतु तो कचरा जमा होणाऱ्या गाडीत एकत्र होतो. स.सदस्यांच्या स्वेच्छा निधीमधून नागरीकांना डस्टबीन्स् देणेसाठी संचिका मंजूरीस्तव आहे. अशा संचिका मंजूर कराव्यात. आजच्या परिस्थितीत काय उपाय योजना केल्या पाहिजे? निर्णय घ्यावा.

श्री.रेणुकादास वैद्य :जागा शोधण्यावर वेळ गेला. जो कचरा जमा होतो तो जिरविण्यावर दुर्लक्ष केले गेले. जिथल्या तिथे कचरा जिरवला असता, तर ही परिस्थिती निर्माण झाली नसती. माझे वार्डात चांगले काम होत आहे. पाच फुटाच्या जागेमध्ये एक टन ओला कचरा खत निर्मिती होते. सुक्या कचऱ्याचा प्रश्न तसाच आहे. मनपाचा निधी आहे शासन निधी देत आहे. काय प्रक्रिया करणार आहोत? एका महिन्यात निर्णय घेऊ शकलो नाही. जे करायचे ते ठरवावे. यंत्र आणले पाहिजे. पैसे असतांना निर्णय घेत नाही. नऊ ठिकाणी करण्याचे ठरले होते. मा.आयुक्तांना पॉवर आहे. स्थायी समितीला अधिकार आहे. निर्णय घ्यावा. सर्व या कामात गुंतलेले असतांना काम होत नाही. तीस दिवसात मनपा निर्णयापर्यंत आले नाही. हे योग्य नाही. कोणती मशीनरी खरेदी करायची? काय करायला पाहिजे? स.पदाधिकारी यांचेशी चर्चा करून आजच्या आज निर्णय घ्यावा. प्रक्रिया चालू झाली की, विरोध होणार नाही. आणखी कर्मचारी द्यावे. जे रस्त्यावर कचरा टाकतात त्यावर कार्यवाही करावी. कचरा हा डस्टबीन्स् मधून घंटागाडीतून गेला पाहिजे. अशी कार्यवाही करावी. कचरा जाळतात. त्यामूळे प्रदुषण होते. असे कृत्य होऊ नये. त्यांचेवर कार्यवाही व्हावी.

श्री.भाऊसाहेब जगताप :४० वार्ड वगळता इतर वार्डात ओला-सुका कचरा वेगळा का होत नाही? झोन ६ मध्ये कचरा वेगवेगळा होतो. परंतु रिक्षा कमी असल्यामूळे कचरा संकलन करण्यास वेळ लागतो त्यामूळे काही लोक कचरा नाल्यामध्ये टाकतात. जेथे मोठा वार्ड तेथे रिक्षा द्याव्यात. वार्डात १३ कर्मचारी आहे. ओला सुका कचरा वेगळा होतो. कचरा वेगळा होत असल्याने ७०-८० किलोच कचरा डम्प होतो. असे पुर्ण शहरात काम केले तर जास्तीचा कचरा निघणार नाही. जुन्या शहरात जागा नाही. जेथे आहे तेथेही विरोध होत आहे. कचरा प्रोसेसींग करावे नागरीकांना विश्वासात घ्यावे. डस्टबीन्स् संचिका मंजूर कराव्यात.

श्रीमती संगीता वाघुले :वार्डात ओला कचरा डम्पींगसाठी मोठी जागा नाही. जागेचे नियोजन करावे ४-५ वार्ड मिळून जागा द्यावी.

मा.महापौर :मा.आयुक्तांसह मी त्या वार्डात पाहणी करतो. जाधववाडी भागात जागा आहे तेथे पाहणी करून निर्णय घेऊ.

श्री.सिताराम सुरे :जाधववाडी येथील १० एकर जागा मनपाच्या नावावर का केली नाही?

श्रीमती शिल्पाराणी वाडकर:माझे वार्डात १०० टक्के सेग्रीकेशन होते. रमानगर भागात १३ वार्डाचा कचऱ्यासाठी जागा निश्चित केली. तेथे दुपारनंतर कुणीतरी मिक्स कचरा ओला

कचऱ्यावर आणून टाकतात. दुर्गधी पसरू शकते. कचरा पेटविला जातो डस्टबीन्स् संचिका मंजूर करावी.

मा.महापौर :संबंधीत अधिकारी यांनी पाहणी करावी. डस्टबीन्स् खरेदीच्या संचिका मंजूर कराव्यात. जर कुणी कचरा पेटवून देत असेल तर कार्यवाही करावी. डस्टबीन्स् खरेदीच्या संचिका निकाली काढाव्यात. कुठपर्यत कार्यवाही झाली? एका तासात माहिती द्यावी. जेथे कचरा जाळला जातो त्यासाठी पेट्रोलिंग पथक स्थापन करावे.

श्री.राजेंद्र जंजाळ :समस्या सोडविण्याचा प्रयत्न करतो आहे. जेथे जागा आहे तेथे कचरा डम्प होतो. परंतु कायम उपाय हा नाही? डिस्पोजल युनीट खरेदी बाबत काय कार्यवाही केली? कचरा वेगवेगळा करणेसाठी एजन्सीला काम दिले होते. त्यांनी नागरीकांना प्रशिक्षण दिले जेथे कचरा वेगळा होत नाही. अशांना पेपरच्या माध्यमातून आवाहन करण्याची गरज आहे. तोपर्यत उपाय योजना होऊ शकत नाही. डम्प करणे हा उपाय नाही. प्लास्टीक डिस्पोजल होण्यास अनेक वर्ष लागतील आरोग्याचा प्रश्न निर्माण होऊ शकेल. कचराची समस्या व प्लॅस्टीक बंदी हे कचरा संबधीचे पुरक विषय आहे. प्लास्टीक बंदी करावी ५० टक्के तो कचरा आहे. बंदी आणल्यास कचरा कमी होईल. डि-सेन्ट्रलाईज करण्याचा विषय झाला होता. जी एजन्सी लवकर प्रोसेसींग युनीट उभे करेल त्यांचेशी करारनामा करावा. पिंपरी-चिचंवड, नागपूर मनपाने वेस्ट एनर्जीचा करार केला. या शहरासाठी ही कोणती प्रोसेस करणार आहे? आमची काय मदत लागणार आहे? सदस्यांनी वार्डातील ओला कचरा कमीत कमी कसा बाहेर येईल यासाठी प्रयत्न करावे. जेणे करून डिस्पोजल साठी त्रास होणार नाही. ओला कचराच डम्प केला पाहिजे. त्यावर फवारणी करावी. दुर्गंधी येणार नाही. डिस्पोजल सॉलीड वेस्ट साठी काय केले? माहिती द्यावी.

श्रीमती माधुरी देशमुख :शासनाने प्लास्टीक बंदी केली, मनपानेही तशी कार्यवाही करावी. कचऱ्यावर बायो कल्चरर टाकण्यास मिळावे. प्लास्टीक वेगळे झाले पाहिजे. ओल्या कचऱ्यावर कम्पोस्ट खत होईल. कचरा डम्प केला तर पाणी दुषीत होईल असा नागरीकांचा समज आहे. तो पेपरच्या माध्यमातून प्रगटन देऊन सांगण्यात यावे. सदस्यांच्या स्वेच्छा निधीतून प्रत्येक वार्डासाठी रि-सायकलींग मशीन्स देण्यात यावे. जे कचरा जाळतात. त्यांचेवर कार्यवाही करावी. वेंगुरला मध्ये जी पध्दत आहे ती अवलंबवावी. त्वरीत ठोस निर्णय घ्यावा.

श्री.जहागीरदार अयुब :नारेगाव येथील कचरा डम्प करणे ६ महिन्यात बंद करावे. मा.न्यायालयाचे सन-२००३ मध्ये आदेश होते. १५ वर्षात याला गंभीरतेने घेतले नाही. माझे वार्डात सेन्ट्रल नाका येथे १२-१३ वार्डाचा कचरा आणून टाकला जातो. बाजूला स्मशानभुमी आहे. तेथील येणाऱ्या-जाणाऱ्या लोकांना त्रास होतो. अनेक ठिकाणी अभ्यास दौरे केले. वेळ पैसा खर्च झाला. त्याचा उपयोग मनपासाठी केला असता, तर ही वेळ आली नसती. नागरीकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होतो आहे. कुणी कॉमेन्ट करणे ऐवजी सल्ला दिला. तर योग्य होईल. प्रत्येक झोन वाईज मशीन्स् लावावे. जो जमा कचरा आहे. त्याची विल्हेवाट लावावी.

चिकलठाणा भागात दोन स्टील कंपनी महाराष्ट्र शासन अंडर टेकींग आहे. जोपर्यत ९ झोन मध्ये मशीन्स् बसवित नाही. तोपर्यत कचरा तेथे दिला तर योग्य आहे. एमआयडीसी मध्ये हा भाग येतो. तेथे प्रदुषणचा प्रश्न निर्माण होणार नाही. कचरा पावडर चांगल्या क्वॉलीटीचे मागवावे.

श्रीमती सिमा खरात :माझे वार्डात सहा वार्डाचा कचरा डम्पींग होतो. सर्वाची मदत मिळत आहे. डस्टबीन्स् व सायकल रिक्षा खरेदीचे प्रस्ताव आहे. मंजूर करावे.

श्रीमती समीना शेख :खदानी रिकाम्या आहे. तेथे कचरा टाकावा.

मा.महापौर :प्रदुषण कन्ट्रोल बोर्डाने ऑब्जेक्शन घेतले आहे. खदानी मध्ये कचरा टाकणे हा पर्याय होऊ शकत नाही.

श्री.प्रमोद राठोड :खड्डे खोदण्यासाठी तातडीने जेसीबी देण्यात यावे. नागरीक कचरा ओला-सुका करण्यास तयार आहे.

मा.महापौर :संबंधीत अधिकारी यांनी दखल घ्यावी. एक एजन्सी नियुक्त करावी.

श्री.नितीन साळवी :माझे वार्डात कचरा गाडी व लेबर द्यावे. रविवारी कर्मचारी सुट्टी मारतात. आणीबाणीची परिस्थिती निर्माण झाली. दोन शिफ्ट मध्ये कचरा उचलण्यात यावा.

श्री.विकास जैन :अनेक वेळा बैठका घेतल्या. निर्णय होत नाही. प्रशासनाने ॲक्शन प्लॅन करावा. अनेक जागा पाहतो. तेथे नागरीक जमा होतात. विरोध करतात. २५ टक्के सेन्ट्रलाईज ७५ टक्के डि-सेन्ट्रलाईज अशा पध्दतीने डीपीआर मंजूर केला. निविदा होणार मशीन्स येणार त्या कुठे लावणार? प्रश्न आहे. एमआयडीसीला पत्र द्यावे. विनंती करावी. तेथे कच्चे मटेरियल असते. अशा ठिकाणी कार्यवाही करता येईल. ११५ वार्डात स्मार्टसिटी मधून १० हजार डस्टबीन मंजूर केल्या. ताबडतोब खरेदी कराव्यात. २५ रिक्षा मंजूर झाल्या. त्याही घ्याव्यात हे ॲक्शन प्लॅन मध्ये यावे. प्रोसेस युनीट करण्याचा अनेकदा विषय झाला. परंतु ठोस निर्णय होत नाही. शासनाच्या जागा मिळतात. परंतु नागरीक विरोध करतात. त्यांना विश्वासात घ्यावे लागेल. एमआयडीसी मध्ये प्रोजेक्ट चालू आहे. डीपीआर नुसार कार्यवाही करावी. शासन मंजूरी देणारच आहे. कुठे जागा आहे. तेथे मशीन लावू शकतो. डी-सेन्ट्रलाईज मध्ये २-३ ठिकाणी प्रोसेस युनीट लावावे. बाकी सेन्ट्रलाईजवर भर दिला पाहिजे. एमआयडीसीला ॲप्रोज केले पाहिजे. जागा त्यांनी लिजवर मनपास दिली पाहिजे. असे नियोजन करून कार्यवाही करावी.

श्रीमती समीना शेख :जुन्या शहरात अनेक दुभाजकावर कचरा टाकला गेला. सुट्टीच्या दिवशी कर्मचारी कामास येत नाही.

मा.आयुक्त :१६ फेब्रुवारी २०१८ पासून नारेगाव येथे कचरा डम्प करणे बंद केले. नारेगाव येथील आंदोलन व मा.न्यायालयाचे आदेश यावर चर्चा करू शकत नाही. कारण मा.कोर्टाने सन-२००३ साली निर्णय दिला की, नारेगाव येथील कचरा डम्प करणे योग्य नाही. वेगळी व्यवस्था करावी. त्यानंतर मा.सर्वोच्च न्यायालय व उच्च न्यायालय यांचे सन-२०१० चे गाईड-लाईन्स आहे व राज्य व केंद्र शासनाचे २०१६ चे सॉलीड वेस्ट मॅनेजमेंन्टचे नियम आहे. त्यामूळे आता कचरा

डम्प करणे हे इल्लिगल आहे. कार्यवाहीची तरतूद आहे. नारेगाव येथे कचरा प्रोसेस साठी जागा दिली तर ते करू शकतो. परंतु कचरा डम्प करता येणार नाही. १६ फेब्रुवारी पासून जो विरोध झाला. त्यानंतर कुठेतरी जागेचा शोध घेऊ असे प्रशासनाला वाटत होते. पर्यायी व्यवस्थेवर जास्त विचार केला नाही. २० दिवसात कुठेही कचरा टाकला नाही. डम्प केला नाही. म्हणून मोठा प्रश्न झाला. सन-२००३ च्या आदेशाचे पालन का केले नाही? म्हणून मुख्य सचिव यांना चौकशी करण्याचे आदेश दिले आहे. ती चौकशी होईल. त्याचा रिपोर्ट कोर्टात तीन महिन्यात सादर होईल. पुढचे नियोजन काय आहे? हे पण आदेश आहे. कचऱ्याची मोठी समस्या निर्माण झाली. त्यावर आताचे व भविष्यातील नियोजन करणे आवश्यक आहे. ॲक्शन प्लॅन असा की, ८६ कोटीचा डीपीआर आहे त्याचा अमल करण्यास ६ महिने लागतील. तो नव्याने तयार करण्याची आज गरज नाही. या प्रोजेक्ट मध्ये मोठे अभ्यासू लोक आहे या प्रोजक्ट बाबत सर्व माहिती देण्यात येईल. डीपीआरच्या बाबतीत शासनाचे मा.उपसचिव येणार आहे. डीपीआरची माहिती दिली जाईल. त्यात काय मुद्दे आहे? त्यानुसार त्वरीत अमलबजावणी होईल. डीपीआर मध्ये नारेगाव येथील कचरा विल्हेवाट लावण्याचा उल्लेख नाही. परंतु मा.न्यायालयाचे आदेश की, एक वर्षात त्या कचऱ्याची विल्हेवाट लावायची आहे. त्यासाठी ५० कोटी लागतील. तो खर्च मनपाला करावा लागेल. त्यासाठी शासन निधी देणार नाही. ९ झोन प्रमाणे नियोजन अपेक्षीत आहे. आतापर्यंत काम झाले नाही. नियोजन झाले नाही. असा भाग नाही. काही वार्डात चांगले काम झाले आहे. ५० टक्के कचरा प्रक्रिया करण्यात आली आहे. झोन ४,५,६,८ मध्ये कुठेही अडचण नाही. कचरा कुंडीचा पुर्वीचा व आताची समस्या काय आहे? काही ठिकाणी कचरा प्रश्न उद्‌भवला त्यापूर्वी काही प्लास्टीक पडलेले होते. एकत्रितपणे सॉलीड वेस्ट मॅनेजमेन्टचे जे नियोजन पाहिजे ते झाले नाही. आज किती कचरा रस्त्यावर आहे. कम्पोस्टींग किती करतो? ते सुरू केले तरी जागा किती? दिवस पुरणार आहे. १००० मॅ.टन कचरा रस्त्यावर ओपन्स्पेस मध्ये आहे. सेन्ट्रल नाका सारखे ८-१० ठिकाणी कचरा आहे. १५ दिवसापूर्वी १० मॅ टन कचरा होता. तो आता १५०० पर्यत असेल. कचऱ्याची विल्हेवाट लावणे महत्वाचे आहे. ॲट सोर्स कचरा विल्हेवाट कशी लावता. येईल यावर भर देत आहोत. नाशिक येथे कुंभमेळा झाला तेथेही कचरा प्रश्न निर्माण झाला होता. रस्त्यावर ओपन स्पेसवर पडलेला कचरा याचे वजन जास्त आहे. सर्वेचे काम चालू आहे. रिपोर्ट येईल. रस्त्यावरील कचऱ्यावर ॲटसोर्स प्रोसेसींग करता येते. ओला कचऱ्याचे कम्पोस्टींग होते. परंतु ओला व सुका कचऱ्याचे ६०-४० प्रमाणात असेल तर ११-१२ दिवसात कमोस्टींग होऊ शकते. उद्यापासून ऑलसाईड कचरा प्रोसेसींग करणार आहे. ११ दिवसात खत होईल. त्यापासून हानी नाही. अनेक एनजीओ येत आहे. जे लवकर काम करतील. त्यांना काम देऊ शकतो. जो कचरा देतो त्यात सुका कचरा जास्त आहे. शहरातील घाण जास्त ही सुका कचरा पासून आहे. सुका कचरा विल्हेवाटीसाठी मनपा प्रशासनाने प्रयत्न केले नाही. डि-

सेन्ट्रलाईज पध्दतीने कचरा जमा करून बाहेर पाठविणे. ओला कचरा कम्पोस्टींग करणे. यासाठी अनेक एजन्सी पुढे येत आहे. स्लम व इतर भागातील लोकांची सभा घेऊन ते वेगवेगळा करतील. मेहनत करतील त्यांना वेज वेट प्रमाणे मिनीमम लेबर रेट जे आहे. ते ठरवून घेऊन देऊ. ते झोन निहाय लोकांची नियुक्ती करून झोन एक सेन्टर करू. काही ठिकाणी आहे ते पुरेसे नाही. आजही झोन क्र.१,२,३ मध्ये जास्त ओला कचरा पडून आहे. साचलेला कचऱ्याची दुर्गधी येणार नाही. त्या ठिकाणी सेग्रीकेशन करणे आवश्यक आहे, जे की जे संकट आहे. त्याबाबतीत काय करायला पाहिजे? हा प्रश्न आहे. शहरात ज्या जागा शिल्लक आहेत त्या १०२ आहे. डी-सेन्ट्रलाईज पध्दतीने काम करायचे झाल्यास एक एकर जागेत ८० टन कचरा ४५ दिवस साचवू शकतो. पिट कम्पोस्टींग करू शकतो. ५-७ एकर जागेवर शहरात ओला कचरावर प्रोसेसींग करण्यात येईल. जागेची यादी सर्वांना देत आहे. झोन क्र.१ मध्ये साई मैदान जागा स्पोर्टची असून त्याचे प्रोफेसर यांना स्वतः भेटलो. तेथे प्रोसेसींग करण्याचा विचार आहे. त्यांनी मान्य केले व आयडीएल कम्पोस्टींग करावे. नागरीकांना आम्ही सांगू. ओला कचऱ्याचे प्रोसेसींग करणे. हे नुकसान नाही. लोकांना सांगू शकलो नाही. रमानगर भागात मोठी जागा आहे. डीपीआर मध्ये प्रस्तावीत आहे. त्यानुसार अडचण येणार नाही. कचऱ्यावर प्रोसेसींग केले नाही. तर नुकसान आहे. कचरा कम्पोस्टींग करतांना काही चुक झाली. तर वार्ड अधिकारी यांचेवर कार्यवाही होईल. तातडीने सर्वांनी काम करणे आवश्यक आहे. आज रोजी ५७ कम्पोस्टींग पीट आहे. एका झोनकडे ८-१० पीट कम्पोस्टींग आहे. एक वार्ड अधिकारी प्रत्येक पीटला व्हिजीट का करू शकत नाही? वेट कम्पोस्टींग करतो. त्याचे नुकसान नाही. ४५ दिवसात खत होते. त्यांचे सिस्टम मध्ये वार्ड एसआयची ड्युटी असते. त्यांची चुक होता कामा नये. एन-१२ भागात कम्पोस्टींग होते आहे. पाहू शकता. मा. महापौर यांचे घराजवळ कम्पोस्टींग होत आहे. युरोप व इतर देशात कम्पोस्टींग किंवा प्रोसेसींग करणे जुना विषय आहे. कचरा प्रश्नामूळे इतर कामेही प्रलंबीत राहू नये. सर्व अधिकारी यांनी जास्तीचे काम करावे. या बाबतचा आढावा घेणेसाठी नियुक्ती अधिकारी दिले जातील. कचरा प्रश्न व इतर महत्वाच्या अत्यावश्यक कामासाठी वार्ड अधिकारी यांना रु.३ लक्ष पर्यंतचे अधिकार दिले. यंत्र खरेदी बाबत आज निर्णय घेऊन सांगण्यात येईल. मोठे यंत्र खरेदी करून खत तयार करणे तो मोठा प्रकल्प होऊ शकतो. दुसरे छोटे यंत्र खरेदी करून त्याचा उपयोग लिमीटेड आहे. वर्गीकरण करू शकतो. त्याची प्रक्रिया कशी होते. याची माहिती आलेली नाही. रु.५५ लक्षची मशीन घेऊन दोन टन कचऱ्याची विल्हेवाट लावणार असेल तर नेमके काय करणार आहे? वर्गीकरण करणेसाठी कार्यवाही करु. कचरा कुंडी प्रश्न सोडविण्यासाठी छोट्या मशीनची आज आवश्यकता वाटत नाही. जर झोन वाईज मशीन बसवून चांगला फायदा होत असेल तर नक्कीच मशीन घेऊ. डीपीआरची अंमलबजावणी होईल. त्यावर चर्चा करणेसाठी मा.उपसचिव येत आहे. आठवड्यातून याचा आढावा घेत राहू. बायो प्लँट

असणार आहे. त्याची रूपरेषा कशी असेल? नंतर माहिती देऊ शकतो. त्याचे वित्तीय नियोजन कसे आहे? रिपोर्ट मध्ये आहे. इंदौरला ज्या एजन्सीने प्लॅन केला त्यांनी येथे येऊन डीपीआर केला. त्यात २७ ठिकाणी विकेंद्रीत पध्दतीने प्रोसेसींग आहे. २७ मोठ्या जागा पाहिजे. मनपाच्या जागा या कामासाठी मिळणेसाठी नागरीकांना विश्वासात घेऊन सभा घेऊन जागा घेणेसाठी वार्डनिहाय सभांचे आयोजन करावे लागेल. सात दिवसात वार्ड सभा घेऊन जागा कशा मिळविता येईल? यांचे नियोजन करावे लागेल. शहरात अनेक जागा आहेत की, तेथे कचऱ्याची विल्हेवाट लावू शकतो. सुक्या कचऱ्याची विल्हेवाट लावणे आवश्यक आहे. यासाठी एनजीओ पुढे आले होते. पुन्हा कामासाठी येत नाही. संभ्रम करणारे काही लोक आहे. जे संकट आहे त्यावर तोडगा काढणेसाठी सज्ज आहोत. आरोग्यावर धोका होणे. वातावरण दुषीत होणे. हे प्रकार होणार नाही. जागा मिळवून देणे आवश्यक आहे. लोक प्रतिनिधीनी नागरीकांना समजून सांगावे. झोन क्रमांक १,२,३ येथे कचरा जास्त आहे. कचरा प्रोसेसींगसाठी जे सहकार्य पाहिजे. ते काम सुरू आहे. नवीन ठिकाणी पीट सुरू झाले. रिपोर्ट दिले जातील. ई-मेलद्वारे मााहिती दिली जाईल. यासाठी अधिकारी यांनी नियुक्ती केली जाईल. ज्या अडचणी येतील. फोनद्वारे बोलू शकता. पुढील १० दिवसात शहराची परिस्थिती बदलणार आहे. ३-४ प्रकारचे नियोजन केले आहे. सात दिवसात कार्यवाही होईल.

श्री.त्र्यंबक तुपे :जेथे जागा आहे. तेथे प्रोसेसींग करणे वर्गीकरण करणेचे काम चालू करावे. अशा ठिकाणी कुणाचाही विरोध होणार नाही. प्लास्टीक बंदी करावी. प्राणी संग्रहालयाच्या बाजूला कचरा डम्प करतो. असे समजले. त्यामुळे प्राण्यांना आजार होऊ नये. याची काळजी घ्यावी. रस्त्याच्या कडेला कचरा टाकतात. तो कचरा केलेला विल्हेवाट लावण्यासाठी डम्प करावे. जो डीपीआर करणार आहे. त्या नुसार कार्यवाही करण्यास सहा महिने वेळ लागणार आहे. तोपर्यंत जी काही प्रोसेस करावी लागणार आहे ती करण्यात यावी.

श्री.दिलीप थोरात :जे पीट कम्पोस्टींग करतो ते पावसाळ्यात करणे शक्य होत नाही. आरोग्य धोक्यात येऊ शकते. इतर मनपात कायम स्वरूपी कचरा विल्हेवाट लावणेसाठी प्रोजेक्ट केलेले आहे. त्याप्रमाणे येथे करावे. मनपाला उत्पन्नही मिळेल.

मा.आयुक्त :जेथे मुख्य पीट कम्पोस्टीग सेन्टर आहे. तेथे शेड करणार आहेत. वॉल बॉन्ड्री करणार आहे.

श्री.प्रमोद राठोड :रॅग फिगर्स तातडीने करावे. जो रस्त्यावर कचरा पडतो तो पडणार नाही. ताबडतोब वेगवेगळा कचरा करता येईल.

मा.महपौर :कचरा या विषयावर अनेक सदस्यांनी आपआपले मत मांडले. मा.प्रशासनाने नियोजन बाबत मत मांडले. कचऱ्याचे वर्गीकरण करून जे कचरा वेचक व भंगारवाले असतील ते प्रक्रिया करणेसाठी घेऊन जाणार असेल तर तसे प्रशासनाकडे कळविण्यात यावे. त्यांना मानधनही दिले जाईल. स.सदस्यांनी कचरा कोंडी या विषयावर सुचना मांडल्या. प्रशासनाने आपले मत मांडले. शहरामध्ये डी-सेन्ट्रलाईज कम्पोस्टींग करायचे. १०२ जागांची यादी दिली. त्यात

सर्वच वार्ड कव्हर होतात. सर्व सदस्यांनी नागरीकांना विश्वासात घेऊन कचरा विल्हेवाट लावण्यासाठीचा प्रश्न सोडविला जाईल. वर्गीकरण करणेसाठी नागरीकांना सुचना दिल्या. विनंती केली. प्लास्टीक बंदी करण्यात येते. काल पासून राज्य शासनाने सुध्दा आदेश जारी केला. शहरातही आज पासून प्लास्टीक बंदी करावी तसे परिपत्रक काढून नागरीकांना व अधिकारी कर्मचारी यांचे माहितीसाठी एक फलक लावून तसे कळविण्यात यावे. उपआयुक्त (प्र) यांनी कार्यवाही करावी.

श्री.दिलीप थोरात :जे वितरकांच्या माध्यमातून प्लास्टिक शहरात येणार आहे. त्यांना बंदी घातली तर योग्य होइल. दुकानदारांपर्यत प्लास्टीक येणार नाही.

श्री.रावसाहेब आमले :अनेक नागरीकांवर ३०७ चे गुन्हे दाखल झाले. १०० महिलांना घरात घुसून मारले गेले. हे योग्य नाही. जे या प्रकरणी दोषी असेल कार्यवाही व्हावी. गट क्र.५४ मध्ये कोणाच्या आदेशाने कचरा टाकला गेला. अधिकारी यांना थांबविले होते. नागरीकांना विश्वासात घेऊ असे म्हटले, परंतु ऐकण्याच्या स्थितीत अधिकारी नव्हते.

मा.महापौर :मिटमिटा भागात मनपाच्याच कर्मचाऱ्याने वाहने जाळली. असा प्रकार झाला असेल तर त्याची चौकशी करावी. अहवाल द्यावा.

श्री्.रावसाहेब आमले :अनेक नागरीकांवर ३०७ चे गुन्हे दाखल झाले १०० महिलांना घरात घुसून मारले गेले हे योग्य नाही. जे दोषी असेल कार्यवाही व्हावी.

मा.महापौर :डीपीआर मंजूर झाला. त्यांची कार्यवाही करावी. ॲक्शन प्लॅन तयार करावा. एक्स्प्रेशन ऑफ इन्ट्रेस जे इच्छुक कुणी असतील, प्रोसेसींग युनीट करीता जे कुणी तयार आहे. ज्या पध्दतीने ते काम करण्यास तयार आहे. त्यांची माहिती घेऊन युआयच्या माध्यमातून कायम स्वरूपी तोडगा काढावा. यासाठी ७-१० एकर जागा लागणार आहे. जागा ते देणार की, मनपा देणार आहे. वेस्ट-टू एनर्जी, गॅस, खत जे प्रपोजल असेल त्या बाबतीत निर्णय घेण्यात येईल. पावसाळ्यात पाणी आले तर विन्डोज शेड तात्पुरते टाकता येतात. कायम स्वरूपी शेड हे १० टक्के पेक्षा जास्त करता येत नाही. आणीबाणीची परिस्थिती लक्षात घेता, तातडीने मा.आयुक्त यांनी त्यांचे अधिकारात निर्णय घ्यावा. ९ प्रभागात ९ खत प्रकल्प निर्मितीचे किंवा विल्हेवाट लावण्याचे यंत्र बसविण्याबाबत प्रस्ताव पाठविला होता. त्या बाबतही निर्णय घ्यावा. स्मार्ट सिटी योजनेच्या माध्यमातून ३५ रिक्षा १० कोटीची प्रोव्हीजन करून दिली होती. मेन्टॉरचे श्री.सुनील पोरवाल साहेब यांनी बैठक घेतली होती. त्यांचे इतिवृत्त कायम केले. त्या बाबत काय झाले? स्मार्ट सिटीच्या माध्यमातून सुध्दा काही डी-सेन्ट्रलाईज करीता कायम तोडगा काढण्यासाठी ६ महिने लागणार आहे. ती वेळ न बघता, स्मार्ट सिटीतून सुध्दा प्रोव्हीजन आहे. मा.आयुक्ताकडे श्री.सिकंदर अली यांनी माहिती द्यावी. रिक्षा खरेदी, मशीनरी खरेदी व डस्टबीन्स् २४० लि.१० हजार डस्टबीन्स् घेण्याचे नियोजन आहे. काम का होत नाही? काम वेळेवर झाले नाही तर संबंधीत अधिकारी हे जबाबदार असतील. जेथे कचरा जाळला जातो त्यासाठी पाहणी करणेसाठी प्रेट्रोलिंग गाडी द्यावी. पथक तयार करावे. श्री.वसंत

निकम हे सुट्टीवर आहे. त्यांचे जागेवर उपआयुक्त (प्र) हे काम पाहतील. कचऱ्यावर टाकणेसाठी चांगल्या दर्जाची औषधी, पावडर खरेदी करावे. सायकल, रिक्षा खरेदी करण्यात यावे. कमी किंमतीत जास्त कचरा जमा होईल. कचरा जमा करणेसाठी सायकल रिक्षाचे कोटेशन मागवा. प्रत्येक प्रभागात सायकल देणेचे नियोजन करावे. खड्डा करणेसाठी मागणी नुसार जेसीबी द्यावे. दुषित पाणी होत असेल तर त्यांचे नमूने घ्यावे. कचरा वेचक व भंगारवाले यांचे बाबतीत निर्णय घ्यावा. रविवारी सुट्टीच्या दिवशी हॉस्पीटल चालू ठेवावे. जागांचा शोध घेणेसाठी वर्ग-१ अधिकारी यांची नियुक्ती करावी. ६७-३ सी नुसार मा.आयुक्तांना आवश्यक ठिकाणी काम करण्यास अधिकार देण्यात येते. एमआयडीसी भागात एलोरा स्टील व महिंद्राची जागा बघण्यात यावी. संबंधीत अधिकारी यांचेशी चर्चा करावी. नागरीकांमध्ये जनजागृती होणे आवश्यक आहे. कम्युनिकेशन होणे गरजेचे आहे ते करावे. सार्वजनिक सुट्टीच्या दिवशीही अधिकारी यांनी काम करावे. उद्यानाच्या बाजूला प्राणी संग्रहालय आहे. त्यांना इजा होणार नाही. याची दखल घ्यावी. जाधववाडी येथील जागेची पाहणी केली जाईल. संबंधीत सभापती यांचेशी चर्चा केली जाईल. नासिक येथील एजन्सीने कुभंमेळा वेळी काम केले. त्या एजन्सीला प्रशासनाने तात्काळ चर्चेसाठी बोलूवन नियुक्त करावे. जो रस्त्यावर इतर जागेवर कचरा पडला आहे. तो तातडीने उचलला जाईल. याची दखल घ्यावी. आता सभा अर्धा तासासाठी तहकूब करण्यात येते.

(वेळ दु.२.०० पुन्हा सभा ३.४० वा सुरू. मा.आयुक्त म्हणून श्री. श्रीकृष्ण भालसिंग हे काम पाहतात.)

श्री.रावसाहेब आमले :माझे प्रश्नाचा खुलासा करावा.

कार्य.अभि.(श्री.अली) :नारेगाव येथे कचरा टाकणे बंद केल्याने दुसरीकडे कचरा टाकणेसाठी जागेचा शोध घेतला जात होता. त्या आधारे गट नं.५४ मिटमिटा मध्ये आपल्या वार्डातील खाजगी जागेवर कचरा टाकणेसाठी मा.आयुक्त यांचेशी झालेल्या चर्चा नुसार आदेशानुसार वर्कशॉप मनपा इंजिनिअर त्यानंतर मी व उपआयुक्त आम्ही साईटवर गेलो होतो. त्यावेळी त्यांना असे वाटले की, कचरा सफारी पार्क मध्ये टाकत आहे. त्यांना समजावून सांगितले की, येथे कचरा टाकला जाणार नाही. त्या पलीकडे गट नं. ५४ मध्ये आप्पाची वाडी आहे. तेथे पाहणी करून कचरा टाकण्यात आला आहे.

श्री.रावसाहेब आमले :कचरा टाकण्यास लेखी आदेश होते का? कचरा टाकला तेथे काय प्रक्रिया केली?

कार्य.अभियंता-श्री.अली :दुसरे दिवशी कचरा टाकणेस व टाकलेल्या कचऱ्यावर प्रक्रिया करणेसाठी गेलो असता नागरीकांनी विरोध केला.

श्री.रावसाहेब आमले :ज्या ड्रायव्हरने गाडी जाळली, तोच छावणी पोलीस मध्ये तक्रार देतो, त्या तक्रारीत त्यांनी स्पष्ट लिहिले की श्री. सिकदंर अली यांचे आदेशाने तक्रार देतो असे म्हटले. तर या मागे कुणाचा हात आहे? ग्रामस्थांचे व पोलीस विभागाचे भांडण लावून देण्याचे काम यात झाले. त्या ड्रायव्हरवर काय

कार्यवाही करणार आहे? या प्रकरणात अनेक नागरीकांवर ३०७ चा गुन्हा दाखल केला. महिलांना मारहाण केली.

मा.महापौर :संबंधीत ड्रायव्हरला नोटीस काढावी. खुलासा मागवावा.

श्री.अफसर खान :मनपाचा ड्रायव्हर गाडी जाळणार नाही. चौकशी करावी. ठराविक व्यक्तीला टार्गेट करणे योग्य नाही. तेथे सुरूवात कशी झाली. दगड कोठून आले? ती सर्व चौकशी करावी.

श्री.रावसाहेब आमले :१०० महिलांवर अत्याचार झाले. महिलांना घरात घुसून मारले. त्या ठिकाणचा व्हिडीओ आहे. दोन दिवस हे काम थांबवू व गावकरी यांना विश्वासात घेऊन हे काम करू. अधिकारी यांनी माझे ऐकले नाही. बळाचा वापर करून अन्याय केला. यात अधिकाऱ्यांचा कट असू शकतो.

श्री.अफसर खान :ज्यांचे आदेशान्वये हे गेले होते. ज्यांचे मुळे मनपा आयुक्त त्याची बदली केली आहे.

श्री.फेरोज खान :जी घटना घडली वाईट आहे. त्यांना पाठिंबा करणार नाही. परंतु अधिकारी यांना टार्गेट करण्याचा प्रयत्न होतो ते योग्य नाही.

श्री.अफसर खान :सर्वच वार्डात ओला-सुका कचरा वेगळा करण्याची तयारी आहे.

श्री.रावसाहेब आमले :जे नागरीकांवर ३०७ चे गुन्हे दाखल केले तर ते परत घ्यावे. ठराव करून शासनाकडे पाठवावा व टाकलेल्या कचऱ्यावर प्रक्रिया करावी. तेथे जे गाड्यांचे नुकसान झाले. त्यांचा खर्च द्यावा. आता पोलीस विभाग व गावकऱ्यांचा वाद निर्माण केला.

श्री.फेरोज खान :जो अत्याचार महिलांवर केले ते वाईट आहे. नागरीकांवर जे गुन्हे नोंद केले ते मागे घ्यावे.

श्री.त्र्यंबक तुपे :मिटमिटा येथे घटना कशी झाली? सर्वांना माहिती आहे. आज एकमेकांवर आरोप करण्याची ही वेळ नाही. त्या गावांना लोकप्रतिनिधी यांनी भेट दिली होती. ज्या जागेवर कचरा टाकला जात होता त्याचा ठराव केला नाही. जागा मालकाची संमती पाहिजे. ते पुर्ण केले नाही. शहरात मध्ये अनेक ठिकाणी कचरा साचला होता. नागरीकांचे आरोग्य धोक्यात येऊ नये म्हणून निर्णय घ्यावा लागला होता. सर्वांनी एकत्र येऊन हे काम करावे लागेल. कुणावर कार्यवाही करून हा प्रश्न सुटणारा नाही. जे निष्पाप नागरीक होते त्याचे वर अत्याचार झाले. मारहाण केली गुन्हे दाखल झाले ते मागे घ्यावे.

श्री.गजानन बारवाल :जे गुन्हे दाखल झाले ते मागे घ्यावे. शासनाकडे विनंती करावी. या प्रकरणाची चौकशी करावी.

मा.महापौर :जो कचरा मिटमिटा भागात गट नं.५४ मध्ये टाकला. त्याची विल्हेवाट कम्पोस्टींग व इतर पध्दतीने लावावी. जो प्रकार झाला. त्याची व जे पुरावे सदस्यांनी दिले की, मनपाच्याच कर्मचारी यांनी गाडी जाळली. याची तीन दिवसात चौकशी करावी. नागरीकांवर ३०७ चे गुन्हे दाखल झाले ते मागे घ्यावे तसा ठराव करून शासनाकडे पाठविण्यात यावा. त्यास मंजूरी देण्यात येते.

श्रीमती रेशमा कुरैशी :दिनांक ०६-०२-२०१८ रोजी भगवान शिक्षण प्रसारक मंडळ या संस्थेस दंड भरण्याबाबत रू.१४.५० कोटीची नोटीस दिली. तर त्यानी पैसे भरले का? त्यांना भोगवटा प्रमाणपत्र कसे दिले गेले.

उप.अभि.श्री.कुलकर्णी :या संदर्भात दंडात्मक व प्रिमीयम जी नोटीस दिली ती रद्द केली नाही.

श्री.अफसर खान :र.रु.१४.५० कोटी दंड भरण्याची नोटीस दिली. ते भरणा केला नसतांना, त्यांना कम्प्लीशन कसे दिले गेले.

उपअभि.श्री.कुलकर्णी :जेवढी बांधकाम परवानगी दिली होती. तेवढ्याच क्षेत्र मर्यादेमध्ये भागशः कम्प्लीशन प्रमाणपत्र दिले आहे. प्रिमीयम व इतर रक्कम ही अतिरिक्त बांधकाम संदर्भात लावली आहे. ती जमा झाली नाही.

श्रीमती रेशमा कुरैशी :र.रु.१४.५० रूपये मोठी रक्कम आहे. ते भरणा करत नाही. तर मनपाचे नुकसान होत आहे.

श्री.गजानन बारवाल :जेवढी परवानगी दिली तेवढे कम्प्लीशन देण्यात आले. प्रीमीयम व इतर रक्कम वसुल करण्याची कार्यवाही होत आहे. शासनाचे विशेष काही नियम निघालेले आहे. त्यानुसार कार्यवाही होत आहे. जी कार्यवाही केली ती योग्य आहे.

श्री.जहागीर खान :र.रु.१४.५० कोटी वसुल न होताच कम्प्लीशन दिले जाते योग्य नाही. इतरही संचिका मंजूरीसाठी आहे. त्यावर निर्णय होत नाही.

श्री.नासेर सिध्दीकी :र.रु.१४.५०कोटी वसुल केल्यानंतर कम्प्लीशन दिले पाहिजे होते. जेवढे बांधकाम परवानगी दिली. तेवढीच कम्प्लीशन दिले. हे त्यांचे उत्तर नाही.

श्रीमती रेशमा कुरैशी :यात देणे घेणे झाले काय? चौकशी करावी. दिलेले कम्प्लीशन रद्द करावे.

श्री.गजानन बारवाल :सहा.संचालक यांना बोलवून खुलासा घ्यावा.

श्रीमती समीना शेख :स्थायी समिती व सर्वसाधारण सभेत अनेक वेळा या विषयावर चर्चा झाली. परंतु ठोस निर्णय घेतला जात नाही. र.रु.१४.५० कोटीची नोटीस दिली जाते व तीन दिवसानंतर कम्प्लीशन दिले जाते हे योग्य नाही.

श्री.गंगाधर ढगे :र.रु.१४.५० कोटी भरण्याची नोटीस दिली जाते व ते भरून न घेता लगेच भोगवटा प्रमाणपत्र दिले जाते. कोणत्या नियमाने हे केले? या विभागात १४ वर्षापासून तेच ते अधिकारी आहे. त्यांची बदली करावी.

श्री.नासेर सिध्दीकी :परवानगी व्यतिरिक्त बांधकाम केले तर झालेले बांधकामचे कम्प्लीशन देऊ शकतो का?

उप.अभि.श्री.कुलकर्णी :जेवढे बांधकाम परवानगी दिली तेवढीच भोगवटा प्रमाणपत्र द्यावे. राज्य शासनाचे तसे निर्देश होते.

श्री.गंगाधर ढगे :ज्यांनी भोगवटा प्रमाणपत्र दिले त्यांना खुलासासाठी बोलवावे.

उप.अभि.श्री.कुलकर्णी :सहा.संचालक नगर रचना श्री.थत्ते यांनी भोगवटा प्रमाणपत्र दिले आहे.

मा.महापौर :आता सहा.संचालक नगररचना यांचा चार्ज श्री.खरवडकर यांचेकडे आहे. ते आज रजेवर आहेत का?

श्रीमती रेशमा कुरैशी :कम्प्लीशन दिले ते रद्द करावे.

श्री.गंगाधर ढगे :दिलेले भोगवटा प्रमाणपत्रास स्थगिती द्यावी.

श्री.गजानन बारवाल :माझे माहिती प्रमाणे सदरील प्रकरण मा.कोर्टात प्रलंबीत आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :शासनाने काय निर्देश दिले होते. तो खुलासा करावा.

उप.अभि.श्री कुलकर्णी :प्रत्यक्ष जागेवर जे बांधकाम झाले त्या अनुषंगाने राज्य शासनाकडे संबंधीत मिळकतधारकाने अपील केले होते. त्यानंतर शासनाने निर्णय दिला आहे. त्यानुसार मनपाने दंडात्मक कार्यवाही करून संबंधीतास नोटीस दिली की, १४ कोटी जमा करावेत. राज्य शासनाचे निर्देश आहेत की, जेवढी बांधकाम परवानगी यापुर्वी दिली आहे. तेवढेच भोगवटा प्रमाणपत्र द्यावे.

श्री.प्रमोद राठोड :नियमाप्रमाणे कार्यवाही केली आहे का?

उप.अभि.श्री.कुलकर्णी :जी परवानगी दिली. ती नियमाप्रमाणे आहे. प्रिमीयम व इतर रक्कम बाबत पत्र दिले ती कार्यवाही आजही कायम आहे.

श्री.दिलीप थोरात :या संदर्भात मा.न्यायालयात प्रकरण प्रलंबीत आहे. त्यावेळेस मा.न्यायालयात सर्व सबमिट झाले होते. हॉस्पीटल धारकानी ॲफिडेव्हिट दिले की, मा.न्यायालय जो निर्णय दंड भरण्याबाबत निर्देश देतील. ते भरण्यास तयार आहे. ट्रस्ट म्हणुन ते हॉस्पीटल आहे. विनाकारण अडचणीत आणण्याचा प्रयत्न होतो आहे. भोगवटा प्रमाणपत्र देणेपुर्वी विधी सल्लागार यांचा अभिप्राय घेण्यात आलेला आहे. त्यांनी ते देऊ नये असे कुठेही लिहिले नाही.

श्री.नासेर सिध्दीकी :र.रु.१४ कोटी मनपास कसे मिळतील त्यासाठी कार्यवाही करावी.

श्रीमती समिना शेख :मा.न्यायालयाचे आदेश नाही तर पार्ट कम्प्लीशन कसे दिले.

श्रीमती रेशमा कुरैशी :र.रु.१४.५० कोटी भरले नसतांना पार्ट कम्प्लीशन दिले कसे?

श्री.जमीर कादरी :जर मा.न्यायालयात प्रकरण होते तर सात मजली इमारत असतांना तीन मजल्याचे कम्प्लीशन द्यावे असे म्हटले का? कम्प्लीशन रद्द करावे. रक्कम वसुल न करता प्रमाणपत्र दिले. कार्यवाही करावी.

मा.महापौर :आज सभेला मा.आयुक्त, सहा.संचालक नगर रचना, विधी सल्लागार उपस्थित नाही माहिती घेता येणार नाही. पुढील सभेत अहवाल द्यावा.

श्री.भाऊसाहेब जगताप :हे प्रकरणावर ३ वर्षापासून चर्चा होत आहे. तीन मजली परवानगी दिली, त्या ऐवजी ७ मजली बांधकाम केले. परवानगी नसतांना जास्तीचे बांधकाम केले. जर जास्तीचे काम केले तर पार्ट परवानगी देता येते का? ती जागा सिडकोची आहे त्यांचे ना हरकत प्रमाणपत्र घेतले का? ती शैक्षणिक संस्थेला सिडकोने जागा दिली त्यातील ४० टक्के जागा क्रिडागंणासाठी रिजर्व पाहिजे. मनपाने दिलेला अहवाल व जिल्हा शाखा कार्यालय यांनी दिलेला अहवाल यामध्ये ३२ टक्केचा फरक येतो. असे असतांना वाढीव बांधकाम परवानगी देत असतांना याचा विचार केला का?

श्रीमती रेशमा कुरैशी :या प्रकरणाची सीबीआय चौकशी लावावी. पार्ट कम्प्लीशन रद्द करावे. निर्णय घ्यावा नसता, मी डायस समोर बसणार आहे. यात मोठा भ्रष्टाचार झालेला आहे.

मा.महापौर :सीबीआय पर्यंत जाणेसाठी तेवढे अधिकार या सभागृहाला नाही. आज नगर रचना विभाग, विधी विभाग व मा.आयुक्त ही उपस्थित नाही.

श्री.नासेर सिध्दीकी :र.रु.१४ कोटीचा प्रश्न आहे ठोस निर्णय घ्यावा.

मा.महापौर :भगवान शिक्षण प्रसारक मंडळ संदर्भात बांधकाम व कम्प्लीशन प्रश्न उपस्थित केला. त्या बाबत नगर रचना विभागाचे जबाबदारी उपस्थित नाही. श्री.थत्ते यांचे

कडे चार्ज आहे. ते रजेवर गेल्याने श्री.सुमीत खरवडकर यांचेकडे चार्ज आहे. तेही रजेवर आहे. विधी सल्लागार दिल्लीला मा.कोर्टाच्या कामासाठी गेले आहे. मा.आयुक्त येथे नाही. या प्रकरणामध्ये जबाबदारीने उत्तर देण्यास कोणीही नाही. या प्रकरणात न्यायालयात प्रकरण आहे. या संपूर्ण प्रकरणाचा अहवाल टिप्पणी पुढील सभेपर्यंत देण्यात यावी.

श्रीमती समीना शेख :सायकल घोटाळा सन-२०१४-१५ चा अहवाल आला नाही.

मा.महापौर :मुख्य लेखा परीक्षक यांनी सायकल, टँकर घोटाळा संदर्भात अहवाल ठेवावा.

मुख्य लेखा परीक्षक :टँकर घोटाळा अहवाल दिला, सायकल घोटाळा बाबत मी चौकशी केली नाही.

श्री.राजगौरव वानखेडे :नगर रचना विभागाचे अधिकारी आज सभेला उपस्थित नाहीत. इतर महानगरपालिकेत नगर रचना प्रमुख म्हणुन शहर अभियंता यांचेकडे चार्ज आहे. त्यामुळे नगर रचना या विभागाचा चार्ज शहर अभियंता यांचेकडे देण्यात यावा.

श्री.प्रमोद राठोड :नगर रचना विभागाची वसुली कमी झालेली आहे. दिलेले टार्गेट पुर्ण केलेले नाही. अनेक संचिका प्रलंबीत आहेत. त्यामुळे शहर अभियंता यांना नगर रचना विभागाचे विभाग प्रमुख म्हणुन चार्ज देण्यात यावा.

मा.महापौर :इतर महानगरपालिकेत नगर रचना विभागाचे कामकाज कशा पध्दतीने चालते? याचा खुलासा करावा.

मा.अतिरीक्त आयुक्त :नगर रचना विभागाचे विभाग प्रमुखाबाबत वेगवेगळ्या महानगरपालिकेत वेगवेगळी पध्दत आहे. बऱ्याच महानगरपालिकेत शहर अभियंता यांचेकडे नगर रचना विभागाचे विभाग प्रमुख हे पद आहे. माहिती घेऊन अहवाल देण्यात येईल.

श्री.त्र्यंबक तुपे :नियमानुसार कार्यवाही करावी. आवश्यकता वाटल्यास सभेसमोर तसा प्रस्ताव आणावा. या विभागात अनेक विकास कामाच्या संचिका थांबलेल्या आहेत. रु.२० ते रु.२५ कोटी उत्पन्न मिळाले असते. इतर महानगरपालिकेचा अहवाल मागवावा. त्यानुसार कार्यवाही करावी.

**निर्णय** :महानगरपालिकेत नगर रचना विभाग अत्यंत महत्वाचा विभाग आहे. मागच्या अनेक महिन्यापासून महानगरपालिकेत कायम स्वरुपी सहाय्यक संचालक या पदावर स्थिर अधिकारी नाही. त्यामुळे या विभागाकडील कामाची निकड लक्षात घेता व नगर रचना विभागातील आर्थिक उद्दिष्ट पुर्ण होण्याच्या दृष्टिने नगर रचना विभागाचे विभाग प्रमुख म्हणुन शहर अभियंता यांचेकडे विभाग प्रमुख पदाचा पदभार देण्यात यावा. नगर रचना विभागातील संचिका सहाय्यक संचालक, नगर रचना यांच्या कडून शहर अभियंता यांच्याकडे पाठविण्यात याव्यात. जेणे करून या विभागावर नियंत्रण राहील, संचिकेचा निपटारा लवकर होईल, आर्थिक उद्दिष्ट पुर्ण होण्याकरीता गती मिळेल व महानगरपालिकेच्या महसुली उत्पन्नात वाढ होईल. या संदर्भात मा.सभापती, स्थायी समिती यांनी सुध्दा निर्देश दिलेले आहेत. कारण या वर्षाचे नगर रचना विभागाचे रु.१०० कोटीचे उद्दिष्ट असतांना आजपर्यंत फक्त रु.३० कोटी जमा झाले आहेत. बऱ्याच बांधकाम परवानग्या/रेखांकन, टीडीआर, गुंठेवारीची प्रकरणे प्रलंबीत आहेत. पर्यायाने यामुळे शहराच्या विकासावर परिणाम झालेला आहे. ही वस्तुस्थिती आहे. तसेच उत्पन्न सुध्दा कमी झालेले आहे. राज्यातील इतर काही महानगरपालिकांमध्ये नगर रचना विभाग हा शहर अभियंता यांचे अधिपत्याखाली येतो. नगर रचना विभागाचे कामकाज गतीशील करणे,

संचिकेचा निपटारा करणे अत्यंत आवश्यक आहे. म्हणुन नगर रचना विभागाचे विभाग प्रमुख म्हणुन शहर अभियंता यांचेवर जबाबदारी देण्यात यावी. तात्काळ प्रशासनाने कार्यवाही करावी.

श्री.प्रमोद राठोड :नगर रचनाचे अधिकारी उपस्थित नाही उद्दिष्ठ पूर्ण केले नाही.

श्री.अफसर खान :र.रु.३०-४० कोटी वसुली होणे अपेक्षीत असते या वर्षी काहीच वसुली जास्त नाही.

श्री.सचीन खैरे :अधिकारी का उपस्थित नाही.

श्री.गंगाधर ढगे :अनेक अधिकारी बऱ्याच दिवसापासून तेथे आहे. बदली का होत नाही?

श्रीमती ज्योती पिंजरकर:वार्डात पाणी येत नाही कचराची समस्या आहे ती सोडवावी.

श्री.किर्ती शिंदे :महिला शौचालयाचे काम पुर्ण करणार होते. पैठण गेट येथे जी जागा निश्चित केली होती. नागरीक विरोध करीत आहे. पुढील बाजूने शौचालय करावे.

कार्य.अभि.ड्रेनेज :पाच ठिकाणी शौचालय करणार आहे. सर्व समितीचे सदस्यांबरोबर पाहणी केली लेखी अहवाल मा.महापौर यांचेकडे सादर केला आहे. मकबरा रोडवरील अंडर कम्प्लीशन आहे तेथे मीटर बसवायचे. औरंगपुरा शौचालयाचे काम चालू आहे. एन-८ बॉटनिकल गार्डन येथील काम आठ महिन्यापासून देयक दिले नसल्याने बंद आहे. ज्युब्ली पार्कचे नागरीकांनी बंद केले. त्यामूळे टाऊन हॉल येथे काम सजेश केले होते. समितीने पाहणी केली. समितीने सम्मती दिली नाही. ते काम सेव्हनहिल येथे करू असे म्हटले.

श्रीमती समीना शेख :जी समिति नेमली, ती मा.कोर्टाच्या निर्देशानुसार केली सेवनहिल येथील जागा रद्द केली ते समितीच्या निदर्शनास आणून दिले का? कोणता प्रस्ताव झाला होता? प्रत दिली नाही.

मा.महापौर :तेथे काम करू शकत असेल तर करावे. मकबरा येथील शौचालयासाठी ताबडतोब दोन दिवसात मीटरची व्यवस्था करावी. मनपाच्या शौचालयाची दुरूस्ती करावी. वेस्टेज होत असलेले पाणी बंद करावे.

कार्य.अभियंता-ड्रेनेज :सेव्हनहिल येथील काम ताबडतोब सुरू केले जाईल.

श्रीमती किर्ती शिंदे :शहरातील सर्व शौचालयाचे दुरूस्ती बाबत आदेशीत करावे.

मा.महापौर :सदस्यांची सुचना विचारात घेऊन शौचालयाची कामे तात्काळ करावी. दुरूस्ती असेल ते काम करावे.

श्री.फेरोज खान :पैठणगेट येथील शौचालय मागिल बाजूस घ्यावे. समोरच्या बाजूने काम करण्यास लोकांना विरोध आहे.

मा.महापौर :समितीने निर्णय दिला त्याप्रमाणे काम करावे.

श्रीमती सुरेखा सानप :ब्रीजवाडी येथील सार्वजनिक शौचालयाचे काम होत नाही. रु.५ लक्षची संचिका मंजूर होत नाही.

मा.महापौर :झोन क्र.६ मध्ये ती संचिका आहे. सदस्यांची सुचना विचारात घ्यावी. तातडीने मंजूर करावे.

श्रीमती संगिता वाघुले :महाराणा एजन्सी चार महिन्यापासून कर्मचाऱ्यांना पगार देत नाही.

मा.महापौर :एजन्सीची चौकशी लावली होती, त्याची काय परिस्थिती आहे? अहवाल द्यावा. कर्मचऱ्यांना वेतन देण्याचे आदेशीत करावे. आजची स्थिती काय आहे. अहवाल द्यावो.

श्री.त्र्यंबक तुपे :चौकशीचा अहवाल घ्यावा. नंतर त्यावर चर्चा करण्यात यावी.

**विषय क्रमांक ३६२:-**

विशेष सर्वसाधारण सभा बुधवार दिनांक ०३.०१.२०१८ (का.प.क्र.०५), विशेष सर्वसाधारण सभा दिनांक ०६.०१.२०१८ (दिनांक ०३.०१.२०१८ रोजीची तहकुब सभा, का.प.क्र.०५) व सर्वसाधारण सभा दिनांक ०८.०१.२०१८ (दिनांक २६.१२.२०१७ रोजीची तहकुब सभा, का.प.क्र.०४) या सर्वसाधारण सभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

विशेष सर्वसाधारण सभा बुधवार दिनांक ०३.०१.२०१८ (का.प.क्र.०५), विशेष सर्वसाधारण सभा दिनांक ०६.०१.२०१८ (दिनांक ०३.०१.२०१८ रोजीची तहकुब सभा, का.प.क्र.०५) व सर्वसाधारण सभा दिनांक ०८.०१.२०१८ (दिनांक २६.१२.२०१७ रोजीची तहकुब सभा, का.प.क्र.०४) या सर्वसाधारण सभांचे इतिवृत्तांत कायम करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ३६३:-** **(शहर अभियंता)**

महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक स्वमअ-२०१५/ प्र.क्र.२४९/नवि-३४,दिनांक १९.११.२०१५ नुसार स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीचा आढावा घेणे.

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक स्वमअ-२०१५/ प्र.क्र.२४९/नवि-३४,दिनांक १९.११.२०१५ नुसार स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीचा आढाव्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ३६४:-** **(कार्यकारी अभियंता-२)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१५, मिटमिटा अंतर्गत सनी ट्रेडींग सेंटर पासून ते तुळजाभवानी मंदिरापर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणे, या कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन २०१५-१६ च्या दरसुचीनुसार रक्कम रु.६४,९९,६८१/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदर कामास मा.आयुक्त महोदय यांची प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे.

सदरील कामाचा खर्च शहरी भागात पुर्न:डांबरीकरण करणे या लेखाशिर्षका अंतर्गत वॉर्ड-१, जी.बी.आर., पान क्र.१, अ.क्र.६ वर उपलब्ध तरतुदीमधून करण्यात येणार आहे.

तरी या कामाकरीता तयार करण्यात आलेले रक्कम रु.६४,९९,६८१/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.१५, मिटमिटा अंतर्गत सनी ट्रेडींग सेंटर पासून ते तुळजाभवानी मंदिरापर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु.६४,९९,६८१/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ३६५:-** **(कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्रमांक-७, मयुरपार्क अंतर्गत १००,१५०,२००,२५० आणि ३०० मीमी व्यासाची जलवाहीनी टाकण्याचे प्रस्तावीत आहे. हा भाग जवळ-जवळ ७०% भाग हा No Network आहे. त्यामुळे या वसाहतींमध्ये जलवाहीनी टाकल्यानंतर पाणी पुरवठा करण्यासाठी लागणारे परिमाण उपलब्ध नाही. तसेच ३०% भागामध्ये जलवाहीनी टाकलेल्या नाहीत. सदरच्या वसाहतीमधील काही नागरीकांनी ३०० ते ५०० फुट अंतरावरून नळ जोडण्या घेतलेल्या आहेत. त्यामुळे त्यांना पाणी पुरवठा होत आहे. या भागामध्ये जलवाहिन्या टाकल्यानंतर आणखी नवीन नळ कनेक्शनची मागणी वाढेल व पाण्याचे परिमाण जास्त लागणार आहे. जलवाहिन्या टाकल्यानंतर पाणी पुरवठा करण्यासाठी पाणी उपलब्ध नाही. या ठिकाणी नवीन रोड होत आहे व भविष्यात नवीन रोड खोदण्याची वेळ येऊन आर्थीक नुकसान होऊ नये म्हणून सदर ठिकाणी १००,१५०,२००,२५० आणि ३०० मीमी व्यासाची जलवाहिनी टाकण्याचे प्रस्तावीत आहे.

त्यानुसार विस्तृत सर्वेक्षण करून वॉर्ड क्र.७, मयुरपार्क अंतर्गत १००,१५०,२००,२५० आणि ३०० मीमी व्यासाच्या डी.आय.के.७ जलवाहीन्या टाकण्यासाठी अंदाजपत्रक र.रु.१,४९,९१,९४४/- चे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण सन २०१६-१७ च्या दरसुचीनूसार तयार करण्यात आलेले आहे. कामासाठी लागणारी तरतुद ही सन २०१७-१८ या लेखाशिर्षकातील भांडवली कामे पाणी पुरवठा या तरतुदीमधून करण्यात आलेली आहे.

तरी वॉर्ड क्रमांक-७, मयुरपार्क अंतर्गत १००,१५०,२००,२५० आणि ३०० मीमी व्यासाची डी.आय.के.७ जलवाहीन्या टाकण्याच्या कामाचे अंदाजपत्रक र.रु.१,४९,९१,९४४/- चे मंजुरी बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

श्री.त्र्यंबक तुपे :पाणी कसे उपलब्ध करून देणार, अनेक भागात अशीच मागणी आहे.

मा.महापौर :वाटर यूटीलिटी कंपनीचा डीपीआर मंजूर आहे जे आता मंजूर करतो ते त्यात समावेश आहेत का? हा खर्च प्रकल्प योजनेतून वजा करून घ्यायला पाहिजे.

कार्य.अभियंता-पापू :या भागात नवीन रस्त्याचे काम चालू असून रस्त्याच्या साईडला पाईप टाकणार आहे. रस्ता करतांना पुन्हा खोदकाम होऊ नये. यासाठी करीत आहोत. काही ठिकाणी लोकांनी लांबवरून कनेक्शन घेतले आहे. त्यासाठी हा प्रस्ताव ठेवला आहे.

श्री.त्र्यंबक तुपे :लाईन टाकणार असेल तर पाणी देण्याची तयारी असावी. यास मंजूर करण्यास विरोध नाही. ज्या भागात सिमेंट रस्ते होणार आहे त्या ठिकाणी अगोदर लाईन टाकावी. ती कामे थांबवू नये.

श्री.प्रमोद राठोड :या भागात टँकर चालू आहे. त्या ऐवजी लाईन टाकत आहे. पैठण-औरंगाबाद लाईनवर कंपनीस कनेक्शन दिले ते बंद करावे. शहरात पुरेसे पाणी देता येईल याचा विचार करावा. नागीरकांना आधी पाणी मिळावे.

श्री.फेरोज खान :जायकवाडीहून येणाऱ्या लाईनवर १२ कंपनीस पाणी देतो, पाणी जुन्या शहरासाठी ही द्यावे.

श्री.ईरशाद खान :४० टक्के अबाऊने दिलेली कामाचे बीले निघत आहे बीले निघतात. त्यापेक्षा कमी असलेली बिले दिली जात नाही. माझे वार्डातील २४ टक्के अबाऊने काम घेतलेली संचिका निकाली काढली जात नाही.

श्री.जफर खान :एक वर्षापासून वार्डात एका ठिकाणी घाण पाणी येते. ते पाणी एका ठिकाणी जमा होते. एका मूलाचा तेथे मृत्यू झाला साईड व्हिजीट झाली काम होत नाही.

श्री.आत्माराम पवार :प्रत्येक वार्डात लाईन टाकावी माझे वार्डात गल्ली नं ४ मध्ये पाणी येत नाही लांबवर नळ कनेक्शन दिले. अनेक वेळा नागरीकांनी मोर्चे काढले. दखल घेतली नाही.या भागा प्रमाणे इतर भागात पाणी लाईन टाकावी.

श्री.अजीम अहेमद :जे ई अंदाजपत्रक तातडीने तयार करीत नाही त्यामूळे कामास उशीर होतो.

श्रीमती विजया बनकर :सौजन्यनगर भागात लाईन टाकावी

श्रीमती ज्योती अभंग :म्हाडा कॉलनी चेतनानगर भागात मनपाचे सफाई कर्मचारी राहतात. त्यांचेसाठी पाईप लाईनचे काम होत नाही. पाणी उपलब्ध नाही असे उत्तरे मिळतात. पाण्याची संचिका कुठे आहे. सांगीतले जात नाही. सर्व ठिकाणी लाईन टाकावी. हा प्रस्ताव मंजूर करू नये सुधारीत यावे.

श्रीमती स्मीता घोगरे :माझे वार्डात शंभुनगर भागात गुंठेवारी भरली असतांना लाईन दिली जात नाही. त्यामुळे लोक रात्रीच्या वेळी इल्लिगल नळ कनेक्शन घेतात.

श्रीमती सुरेखा सानप :फुलेनगर भागात पाण्याची लाईन दुरूस्त करावी. आज रोजी घाण-पाणी येते. उत्तरानगरीला ही पाणी द्यावे.

श्रीमती मिना गायके :गल्ली न. ६,९ मध्ये घाण पाणी येते.

कार्य.अभियंता-पापू :दुरूस्तीचे काम करता येत नाही. पाईपच बदलावे लागेल. ६७-३-सी मध्ये जास्त अबाऊने काम जात आहे. पाईपची किंमत वाढली आहे.

श्री.मनोज गांगवे :माझे वार्डात दुषीत पाणी येते. ते बंद करावे.

श्रीमती संगिता वाघुले :आरतीनगर भागात टॅक्स वसूल करतो लाईन टाकून द्यावी.

श्रीमती वैशाली जाधव :हिनानगर, शहानगर, दत्तनगर सावित्रीनगर भागात पाणी लाईन टाकावी.

श्री.जफर खान :माझे वार्डातील घाण पाणी बंद करण्याचे काम केंव्हा होणार आहे.

श्री.दिलीप थोरात :समांतर एजन्सचे मा.कोर्टात प्रकरण आहे त्याची स्थिती काय आहे? पैठण ते नक्षत्रवाडी लाईन करावी.

श्री.त्र्यंबक तुपे :या कामा प्रमाणे शहरातील सर्व भागातील ही पाणी पुरवठ्याची अंदाजपत्रक तयार करावे.

श्री.प्रमोद राठोड :समांतर बाबत मा.कोर्टात काय प्रकरण चालू आहे. त्या कंपनीला आमचा विरोध आजही आहे. लवकर पाठपूरावा करून योग्य ती कार्यवाही करावी. अनेक वार्डात पाईप लाईनची गरज आहे.

श्रीमती ज्योती पिंजरकर:सहा दिवसाआड व ३०-३५ मिनिटे पाणी असते पाण्याला प्रेशर नसते. श्री.पदमे फोन उचलत नाही.

श्रीमती सिमा खरात :हडको सिडको भागात वर्षाला ७२ दिवस पाणी येते. कधी पाच दिवसाआडही पाणी देतात. गॅप असेल त्या दिवशी वेळेवर कळविले जात नाही. वेळेवर व ४५ मिनिटे पाणी मिळावे.

श्रीमती स्वाती नागरे :एन-५ व एन-७ टाकीवर किती पाणी येते? व आमच्या भागात ३ महिन्यापासून किती पाणी दिले जाते?

श्रीमती शिल्पाराणी वाडकर:पाणी येते प्रेशर नसते, काही भागात पहाटे ४ वाजता पाणी येते. त्याची वेळ बदलावी.

श्री सचीन खैरे :पार्वतीनगर व न्यु साईनगर कॉलनी भागात दोन रस्त्याचे अंदापत्रक तयार आहे लाईन नसल्याने काम होत नाही. बेगमपूरा स्मशानभुमीमध्ये नळ कनेक्शन द्यावे. बुस्टर बसविण्या बाबत आदेश केले होते काम केले नाही.

श्रीमती लता निकाळजे :कमी दाबाने पाणी येते. प्रेशर नसते.

मा.महापौर :शहरात पाणी दिले जात नाही जायकवाडीतून येणारे पाणी काही कंपनीला दिले जाते. उन्हाळा लागला की, पाणी ज्या पध्दतीने कमी करीत असतो सर्व पाण्याला मीटर असेल. नसेल मीटर लावावे. पाणी २० टक्के पाणी कपात करावे. पाणी विक्री करून नफा कमविले हा मनपाचा उद्देश नाही.

कार्य.अभियंता-पापू :पुर्वीचे कनेक्शन जे आहे तेच आहे नवीन कनेक्शन दिले नाही. २ एमएलडी पाणी जाते.

मा.महापौर :हे पिण्याचे पाणी आहे फिल्टर आहे. कंपनीला दुसरे बोरींग व इतर पाणी वापर होऊ शकतो. २० टक्के पाणी कपात करावे. रस्त्यांची कामे सुरू करणे साठी अंदाजपत्रक तयार आहे. ते एकत्र करावे. त्याची यादी माझेकडे द्यावी. त्यास आजच्या तारखेत मंजूर करावी. कंपनीच्या डीपीआर मध्ये जो खर्च असेल तो वजा करावा. ओव्हरलॅप होऊ नये. त्यानंतर मनपाच्या फंडातील कामे असेल त्याचे नियोजन करावे. आजच्या तारखेत ते सर्व प्रस्ताव द्यावे. त्यास आजच मंजूरी देण्यात येते. विकास कामास विरोध नाही. जे कामाचे अंदाजपत्रक, टेंडर मध्ये प्रलंबीत असेल ते सर्व सादर करावे.

श्री.अय्युब जहागीरदार :माझे वार्डातील कामाचे टेंडर झाले एजन्सी फिक्सींगसाठी थांबले.

श्रीमती ज्योती अभंग :एन-७ च्या टाकीवरून दिवसभर ३००-४०० टँकर भरून जाते. साध्या रजिस्टरवर नोंद होते. हे योग्य नाही.

मा.महापौर :पुढील बैठकीत अहवाल द्यावा. श्री.जफर खान यांचे वार्डातील दुरूस्तीचे काम करावे. श्री.पदमे यांनी फोन चालू ठेवावा.

श्री.जमीर कादरी :माझे वार्डात पिण्याच्या पाण्यात ड्रेनेजचे पाणी येते.

श्री.त्र्यंबक तुपे :टँकरची नोंद साधे रजिस्टरवर होत असेल तर हे योग्य नाही. नवीन पध्दतीने नोंद करता येईल का? ते पहावे. कोठे टँकर जाते? सर्व माहिती यावी. पावती बुक ठेवावे सिरीयल नंबर असेल योग्य ते नियोजन असावे. ऑडीट करावे.

कार्य.अभियंता :जेथे टँकर भरतो तेथे सीसीटीव्ही कॅमेरा आहे.

मा.महापौर :आलेले पाणी व वाटप करतांनाचे पाणी ऑडीट का होत नाही? जीपीएस सिस्टीम लावावे. शहर अभियंता यांनी या बाबतीत लक्ष द्यावे.

श्रीमती ज्योती अभंग :जेथे टँकर मंजूर आहे वसाहती आहे तेथील टँकर कोठे जाते? टँकर येते तेंव्हा सदस्यांची सही घेतली पाहिजे.

श्री.प्रमोद राठोड :मनपाने जीपीएस सिस्टम लावावे. पाण्याची चोरी होऊ नये यासाठी हे करावे.

श्री.त्र्यंबक तुपे :टँकर काही भागात पोहचत नाही तर ते पाणी कुठे व कोणाच्या सांगण्यावरून दिले जाते? सर्व टँकरचे ऑडीट करावे.

मा.महापौर :जे जे पाणी प्रश्नाबाबत अंदाजपत्रक असतील, ते मंजूर करून घ्यावे. टँकर जातांना त्यांची एंन्ट्री कॉम्प्युटरवर करावी. श्रीमती सानप यांचे वार्डातील घाण पाणी बंद करावे. श्रीमती गायके यांचे वार्डातील लाईन बदलावी. गुरूदत्तनगर

मध्ये १००-१५० घराचा पाण्याचा प्रश्न सोडवावा. श्रीमती अभंग यांचे वार्डातील पाण्याचे काम करावे. जे तातडीचे काम असेल ते ६७-३-सी मध्ये करावे. श्री.सचिन खैरे यांचे वार्डात पाणी येणेसाठी बुस्टर लावावे. श्री.पिंजरकर यांचे वार्डातील काम करावे. श्रीमती खरात यांचे वार्डातील काम करावे.

श्रीमती संगिता वाघुले :माझे वार्डातील पाईप लाईनची संचिका दीड वर्षापासून गहाळ झाली.

मा.महापौर :संचिकेवर नंबर असेल तर तरी गहाळ कसे होते? हे योग्य नाही. सर्व पाणी पुरवठा इतर सर्व कामाचे संचिका मंजूरीसाठी पाठवाव्यात.

कार्य.अभियंता :वॉटर युटीलिटी संदर्भात मा.कोर्टात काय स्थिती आहे. लवादकडे काय झाले? माहिती द्यावी. शुक्रवारी संचिका पाठविली जाईल.

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्रमांक-७, मयुरपार्क अंतर्गत १००,१५०,२००,२५० आणि ३०० मीमी व्यासाच्या डी.आय.के.७ जलवाहीन्या टाकण्याच्या कामाच्या र.रु.१,४९,९१,९४४/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ३६६:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.६१ येथे मनपा अर्थसंकल्प सन २०१७-१८ मधील खालील कामाचे लेखाशिर्ष रहिवासीयांच्या सुविधेसाठी बदलण्यात यावे.

| पान क्र.व अ.क्र. | जुने लेखाशिर्ष | नवीन लेखाशिर्ष |
|---|---|---|
| Adm.new Work p.no.1 c.no.5 | बारापुल्ला, मकईगेट पुल तयार करणे. आर्थिक तरतुद र.रु.०१ कोटी | वॉर्ड क्र.६१ अल्तमश कॉलनी येथे विविध ठिकाणी व्हॉईट टॉपिंग रस्ते तयार करणे. या कामासाठी रु.५० लक्ष वळती करण्यात यावे. |

करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**सुचक:-**श्री.जहागीरदार मोहम्मद अय्युब गुलाम जिलानी **अनुमोदक:-**श्रीमती सरिता अरुण बोर्डे

श्री.सचिन खैरे :मकईगेटचा पुल जिर्ण झाला. हा निधी तेथे वापरावा. या गेटचे सुशोभिकरण करावे.

श्रीमती समीना शेख :पुलाचे काम केले तरच गेटचे काम करता येईल. तोपर्यत हे बजेट लॅप्स होईल.त्यामूळे प्रस्तावित केलेले काम करावे.

मा.महापौर :३६६,३६७ बाबतील स.श्री.अय्युब जहागीरदार व श्रीमती नसरीन बेगम यांचे या दोन्ही प्रस्तावा संदर्भात ऑब्जेक्शन आहे. त्यामूळे हे दोन्ही प्रस्ताव स्थगित करण्यात येते.

श्रीमती समीना शेख :विकास काम थांबवून आहे.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तुत प्रस्ताव स्थगित करण्यात येतो.

**<u>विषय क्रमांक ३६७:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मनपा अर्थसंकल्प सन २०१७-१८ मधील खालील कामाचे लेखाशिर्ष रहिवासीयांच्या सुविधेसाठी बदलण्यात यावे.

| पान क्र.व अ.क्र. | जुने लेखाशिर्ष | नवीन लेखाशिर्ष |
|---|---|---|
| Adm.new | बारापुल्ला, मकईगेट पुल | शहर मंजुर विकास आराखडा खासगेट, बायजीपुरा |

| | | |
|---|---|---|
| Work p.no.1 c.no.5 | तयार करणे. आर्थिक तरतुद र.रु.०१ कोटी | १५ मीटर डीपी रोड मधील उर्वरित जिन्सी टॉवर ते खासगेट चौक रस्ता व्हॉईट टॉपिंग करणे,या कामासाठी रु.५० लक्ष वळती करण्यात यावे. |

करीता, वरील नमुद प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती शेख समिना शेख इलियास **अनुमोदक:-**श्री.जहागीरदार मोहम्मद अय्युब गुलाम जिलानी

मा.महापौर :३६६,३६७ बाबतील स.श्री.अयुब जहागीरदार व श्रीमती नसरीन बेगम यांचे या दोन्ही प्रस्तावा संदर्भात ऑब्जेक्शन आहे. त्यामूळे हे दोन्ही प्रस्ताव स्थगित करण्यात येते.

**ठराव:-**

प्रस्तुत प्रस्ताव स्थगित करण्यात येतो.

**विषय क्रमांक ३६८:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका अर्थसंकल्प सन २०१७-१८ वॉर्ड क्र.४९ अंतर्गत खालील कामाचे लेखाशिर्ष परिसरातील नागरीकांच्या सुविधेसाठी बदलण्यात यावे.

| अ.क्र. पान क्र. | जुने कामाचे नाव | नवीन कामाचे नाव | रक्कम |
|---|---|---|---|
| Ward-01-Spill p.no.22 sr.no.3 | वॉर्ड क्र.४९ अंतर्गत औरंगपुरा भाजीमंडई ते बारुदगरनाला पर्यंत रस्त्याचे व्हाईट टॉपींग करणे. आर्थिक तरतुद रु.९४.६४ लक्ष | वॉर्ड क्र.४९ अंतर्गत विविध ठिकाणी चौकात हायमास्ट बसविणे व पोलसह विद्युत व्यवस्था करणे. | २५.०० लक्ष |
| | | वॉर्ड क्र.४९ अंतर्गत मनपा मुख्य प्रशासकीय इमारती परिसरातील पेव्हर ब्लॉक दुरूस्ती करणे मुख्य गेट समोरील दोन्ही बाजुस असलेल्या कब्रस्ताना समोर फुटपाथवर नवीन पेव्हर ब्लॉक बसविणे. | १०.०० लक्ष |
| | | वॉर्ड क्र.४९ अंतर्गत जुना बाजार येथील औरंगाबाद हॉस्पीटल ते सोहेल भाई यांच्या घरापर्यंत कॉंक्रीट रस्ता तयार करणे. | १४.०० लक्ष |

करीता, वरील नमुद प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**सुचक:-**श्री.गंगाधर नामदेव ढगे **अनुमोदक:-**श्री.खान फेरोज मोईनुद्दीन

श्री.विकास जैन :हा रस्ता डिफर मध्ये रु.१०० कोटीत आहेत का ?

कार्य.अभियंता :एकूण जे ३२ रस्ते घेतले त्या रु.१०० कोटीचे कामात हे काम समावेश आहे.

श्री.गंगाधर ढगे :मला बोलू द्यावे. प्रस्ताव का टाकला? ते बोलू द्यावे.

मा.महापौर :मला माहिती घ्यायची आहे. स.सदस्य आपण खाली बसावे.

श्री.गंगाधर ढगे :मी बसणार नाही. मला बोलू द्यावे. त्यावर काय निर्णय घ्यायचा तो घ्यावा.

मा.महापौर :मी सांगतो ते आपण ऐकत नाही तर तुमचे सभासदत्व रद्द करण्यात येते. आपण आता बाहेर जावे. अधिकारी यांनी खुलासा करावा की, नवीन जे कामे टाकली ते त्यात नाही. त्यामुळे मंजूर करण्यास हरकत नाही. विषय मंजूर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिका अर्थसंकल्प सन २०१७-१८ वॉर्ड क्र.४९ अंतर्गत खालील कामाचे लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. पान क्र. | जुने कामाचे नाव | नवीन कामाचे नाव | रक्कम |
|---|---|---|---|
| Ward-01-Spill p.no.22 sr.no.3 | वॉर्ड क्र.४९ अंतर्गत औरंगपुरा भाजीमंडई ते बारुदगरनाला पर्यंत रस्त्याचे व्हाईट टॉपींग करणे. आर्थिक तरतुद रु.९४.६४ लक्ष | वॉर्ड क्र.४९ अंतर्गत विविध ठिकाणी चौकात हायमास्ट बसविणे व पोलसह विद्युत व्यवस्था करणे. | २५.०० लक्ष |
| | | वॉर्ड क्र.४९ अंतर्गत मनपा मुख्य प्रशासकीय इमारती परिसरातील पेव्हर ब्लॉक दुरूस्ती करणे मुख्य गेट समोरील दोन्ही बाजुस असलेल्या कब्रस्ताना समोर फुटपाथवर नवीन पेव्हर ब्लॉक बसविणे. | १०.०० लक्ष |
| | | वॉर्ड क्र.४९ अंतर्गत जुना बाजार येथील औरंगाबाद हॉस्पीटल ते सोहेल भाई यांच्या घरापर्यंत कॉंक्रीट रस्ता तयार करणे. | १४.०० लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ३६९:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.२१, कबाडीपुरा, बुढ्ढीलेन अंतर्गत खालील कामाचे लेखाशिर्ष बदलण्यात यावे.

| अ.क्र. | मनपा बजेट मध्ये आलेले कामाचे नाव | अ.प.र.रु. | या कामाच्या नावाचा समावेश करण्यात यावा |
|---|---|---|---|
| 01 | सिटीचौक काली मस्जिद समोर कॉंक्रेटींग करणे | १०.०० | वॉर्ड क्र.२१ कबाडीपुरा अंतर्गत विविध ठिकाणी कॉंक्रेटींग करणे. (र.रु.१०.०० लक्ष) |

करीता, वरील नमुद प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती परविन खैसर खॉन **अनुमोदक:-**श्रीमती शेख नरगीस सलीम

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.२१, कबाडीपुरा, बुढ्ढीलेन अंतर्गत खालील कामाचे लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | मनपा बजेट मध्ये आलेले कामाचे नाव | अ.प.र.रु. | या कामाच्या नावाचा समावेश करण्यात यावा |
|---|---|---|---|
| 01 | सिटीचौक काली मस्जिद समोर कॉंक्रेटींग करणे | १०.०० | वॉर्ड क्र.२१ कबाडीपुरा अंतर्गत विविध ठिकाणी कॉंक्रेटींग करणे. (र.रु.१०.०० लक्ष) |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ३७०:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पातील खालील कामे रद्द करून प्रभागात आवश्यक असणारी दुसरी विकास कामे करणे बाबत लेखाशिर्ष बदलाचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | रद्द करावयाच्या कामाचे नाव | करावयाच्या कामाचे नाव |
|---|---|---|
| ०१ | सन २०१७-२०१८ च्या अर्थसंकल्पात जीबीआर पान क्र.४० वरील अनुक्रमांक ०१ वर प्रभाग क्रमांक-७९ अंतर्गत पहाडे कॉर्नर | १. प्रभाग क्रमांक-७९ अंतर्गत भुषणनगर येथील रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे र.रु.२५.०० लक्ष. |

| | | |
|---|---|---|
| | ते पुंडलीकनगर येथील मंजुर असलेल्या रस्त्याचे उर्वरित काम करणे. र.रु.५०.०० लक्ष | २. प्रभाग क्रमांक-७९ अंतर्गत चौंडेश्वरी सोसायटी येथील रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे. र.रु.१०.०० लक्ष.<br>३. वॉर्ड क्र.७९ अंतर्गत रस्त्यावरील पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी ठिकठिकाणी लोखंडी जाळ्या बसविणे. र.रु.१०.०० लक्ष.<br>४. वॉर्ड क्र.७९ अंतर्गत पहाडे कॉर्नर ते पुंडलीकनगर रस्त्याचे सुशोभीकरण करणे. र.रु.०५.०० लक्ष. |
| ०२ | सन २०१७-२०१८ च्या अर्थसंकल्पात एससीआर पान क्र.४५ वरील अनुक्रमांक ०२ वर प्रभाग क्रमांक-७९ अंतर्गत भुषणनगर सोसायटी येथे रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे. र.रु.२०.०० लक्ष. | वॉर्ड क्र.७९ अंतर्गत भुषणनगर सोसायटी येथे खुल्या जागेवर विविध विकास कामे करणे र.रु.०९.०० लक्ष. |
| ०३ | सन २०१७-२०१८ च्या अर्थसंकल्पात जीबीआर पान क्र.४० वरील अनुक्रमांक ०२ वर प्रभाग क्रमांक-७९ अंतर्गत विविध ठिकाणी कॉंक्रीटीकरण करणे. र.रु.४०.०० लक्ष. | वॉर्ड क्रमांक-७९ न्यायनगर अंतर्गत विविध ठिकाणी पेव्हर ब्लॉक बसविणे. र.रु.१६.०० लक्ष |
| ०४ | १. सन २०१७-२०१८ च्या अर्थसंकल्पात जीबीआर पान क्र.४४ वरील अनुक्रमांक ०१ वर प्रभाग क्रमांक-७९ अंतर्गत बौध्दविहार येथे बैठकीसाठी छोटा हॉल बांधणे. र.रु.१०.०० लक्ष.<br>२. सन २०१७-२०१८ च्या अर्थसंकल्पात जीबीआर पान क्र.४४ वरील अनुक्रमांक ०२ वर प्रभाग क्रमांक-७९ अंतर्गत विविध ठिकाणी विद्युत पथदिवे पोलसहीत उभारणे. र.रु.१०.०० लक्ष. | वॉर्ड क्रमांक-७९ न्यायनगर अंतर्गत विविध ठिकाणी एलईडी, थ्री-सेट लाईट पोलसह लावणे. र.रु.२०.०० लक्ष. |

करीता, वरील नमुद प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**सुचक:-**श्री.गजानन भानुदास मनगटे **अनुमोदक:-**श्री.गंगाधर नामदेव ढगे

मा.महापौर : प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.७९ अंतर्गत सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पातील खालील कामांचे लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | रद्द करावयाच्या कामाचे नाव | करावयाच्या कामाचे नाव |
|---|---|---|
| ०१ | सन २०१७-२०१८ च्या अर्थसंकल्पात जीबीआर पान क्र.४० वरील अनुक्रमांक ०१ | १. प्रभाग क्रमांक-७९ अंतर्गत भुषणनगर येथील रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे |

| | | |
|---|---|---|
| | वर प्रभाग क्रमांक-७९ अंतर्गत पहाडे कॉर्नर ते पुंडलीकनगर येथील मंजुर असलेल्या रस्त्याचे उर्वरित काम करणे. र.रु.५०.०० लक्ष | र.रु.२५.०० लक्ष.<br>२. प्रभाग क्रमांक-७९ अंतर्गत चौंडेश्वरी सोसायटी येथील रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे. र.रु.१०.०० लक्ष.<br>३. वॉर्ड क्र.७९ अंतर्गत रस्त्यावरील पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी ठिकठिकाणी लोखंडी जाळ्या बसविणे. र.रु.१०.०० लक्ष.<br>४. वॉर्ड क्र.७९ अंतर्गत पहाडे कॉर्नर ते पुंडलीकनगर रस्त्याचे सुशोभीकरण करणे. र.रु.०५.०० लक्ष. |
| ०२ | सन २०१७-२०१८ च्या अर्थसंकल्पात एससीआर पान क्र.४५ वरील अनुक्रमांक ०२ वर प्रभाग क्रमांक-७९ अंतर्गत भुषणनगर सोसायटी येथे रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे. र.रु.२०.०० लक्ष. | वॉर्ड क्र.७९ अंतर्गत भुषणनगर सोसायटी येथे खुल्या जागेवर विविध विकास कामे करणे र.रु.०९.०० लक्ष. |
| ०३ | सन २०१७-२०१८ च्या अर्थसंकल्पात जीबीआर पान क्र.४० वरील अनुक्रमांक ०२ वर प्रभाग क्रमांक-७९ अंतर्गत विविध ठिकाणी कॉंक्रीटीकरण करणे. र.रु.४०.०० लक्ष. | वॉर्ड क्रमांक-७९ न्यायनगर अंतर्गत विविध ठिकाणी पेव्हर ब्लॉक बसविणे. र.रु.१६.०० लक्ष |
| ०४ | ३. सन २०१७-२०१८ च्या अर्थसंकल्पात जीबीआर पान क्र.४४ वरील अनुक्रमांक ०१ वर प्रभाग क्रमांक-७९ अंतर्गत बौध्दविहार येथे बैठकीसाठी छोटा हॉल बांधणे. र.रु.१०.०० लक्ष.<br>४. सन २०१७-२०१८ च्या अर्थसंकल्पात जीबीआर पान क्र.४४ वरील अनुक्रमांक ०२ वर प्रभाग क्रमांक-७९ अंतर्गत विविध ठिकाणी विद्युत पथदिवे पोलसहीत उभारणे. र.रु.१०.०० लक्ष. | वॉर्ड क्रमांक-७९ न्यायनगर अंतर्गत विविध ठिकाणी एलईडी, थ्री-सेट लाईट पोलसह लावणे. र.रु.२०.०० लक्ष. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ३७१:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.५३ मधील मनपा अर्थसंकल्प सन २०१७-१८ मधील खालील विकास कामाचे लेखाशिर्ष रहिवाशीयांच्या सुविधेसाठी बदलण्यात यावे. करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| पान क्र.व अ.क्र. | मनपा अर्थसंकल्प सन २०१७-१८ मधील काम | नविन लेखाशिर्ष या कामासाठी निधी वळती करण्यात यावा. |
|---|---|---|
| Ward no.02 | वॉर्ड क्र.५३, जरीपुरा,गांधीनगर अंतर्गत | वॉर्ड क्र.५३ अंतर्गत विविध ठिकाणी |

| | | |
|---|---|---|
| Spill P.NO.33 | रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीट करणे. आर्थिक तरतुद रु.२० लक्ष. | सिमेंट कॉंक्रीट व गट्टु बसविणे या कामासाठी आर्थीक तरतुद वळती करण्यात यावी. एकूण तरतुद रु.२० लक्ष |

**सुचक:-**श्रीमती बबिता विजय चावरीया **अनुमोदक:-**श्री.रामेश्वर बाबुराव भादवे
मा.महापौर : प्रस्ताव मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.५३ अंतर्गत मनपा अर्थसंकल्प सन २०१७-१८ मधील खालील विकास कामाचे लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| पान क्र.व अ.क्र. | मनपा अर्थसंकल्प सन २०१७-१८ मधील काम | नविन लेखाशिर्ष या कामासाठी निधी वळती करण्यात यावा. |
|---|---|---|
| Ward no.02 Spill P.NO.33 | वॉर्ड क्र.५३, जरीपुरा,गांधीनगर अंतर्गत रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीट करणे. आर्थिक तरतुद रु.२० लक्ष. | वॉर्ड क्र.५३ अंतर्गत विविध ठिकाणी सिमेंट कॉंक्रीट व गट्टु बसविणे या कामासाठी आर्थीक तरतुद वळती करण्यात यावी. एकूण तरतुद रु.२० लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ३७२ :-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,वॉर्ड क्र.५३ मधील मनपा अर्थसंकल्प सन २०१७-१८ मधील खालील विकास कामाचे लेखाशिर्ष रहिवासीयांच्या सुविधेसाठी बदलण्यात यावे. करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| पान क्र.व अ.क्र. | मनपा अर्थसंकल्प सन २०१७-१८ मधील काम | नविन लेखाशिर्ष या कामासाठी निधी वळती करण्यात यावा. |
|---|---|---|
| Ward no.02 Spill P.NO.33 | वॉर्ड क्र.५३, दलालवाडी अंतर्गत ड्रेनेज लाईन व सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे. आर्थिक तरतुद रु.२० लक्ष. | वॉर्ड क्र.५३ कामगार कॉलनी, दलालवाडी येथे गार्डन विकसीत करणे. आर्थिक तरतुद वळती करण्यात यावी. रु.२० लक्ष |

**सुचक:-**श्रीमती बबिता विजय चावरीया **अनुमोदक:-**श्री.रामेश्वर बाबुराव भादवे
मा.महापौर : प्रस्ताव मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.५३ येथे मनपा अर्थसंकल्प सन २०१७-१८ मधील खालील विकास कामाचे लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| पान क्र.व अ.क्र. | मनपा अर्थसंकल्प सन २०१७-१८ मधील काम | नविन लेखाशिर्ष या कामासाठी निधी वळती करण्यात यावा. |
|---|---|---|
| Ward no.02 Spill P.NO.33 | वॉर्ड क्र.५३, दलालवाडी अंतर्गत ड्रेनेज लाईन व सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे. आर्थिक तरतुद रु.२० लक्ष. | वॉर्ड क्र.५३ कामगार कॉलनी, दलालवाडी येथे गार्डन विकसीत करणे. आर्थिक तरतुद वळती करण्यात यावी. रु.२० लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ३७३:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.०२, भगतसिंग नगर येथे ५०% पेक्षा जास्त दलित वस्ती असुन ह्या भागामध्ये ड्रेनेज लाईन तथा रस्त्यांची काहीच व्यवस्था नाही. करीता शासनाच्या दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत ह्या भागाच्या विकासासाठी खालील दर्शविलेल्या विकास कामांसाठी निधी प्राप्त करणेसाठी प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी यांचे कार्यालयास पाठविणेसाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

१. वॉर्ड क्र.०२, भगतसिंग नगर येथे ड्रेनेज लाईन टाकणे. (रु.०१ कोटी)
२. वॉर्ड क्र.०२, भगतसिंग नगर येथे विद्युत व्यवस्था करणे. (रु.२५ लक्ष)
३. वॉर्ड क्र.०२, भगतसिंग नगर येथे विविध ठिकाणी कॉंक्रीटीकरण करणे (रु.२५ लक्ष)

**सुचक:-**श्री.बन्सी ग्यानु जाधव **अनुमोदक:-**श्री.गजानन भानुदास मनगटे
मा.महापौर : प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.०२, भगतसिंग नगर येथे शासनाच्या दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत विविध विकास कामे करण्यासाठी रु.१ कोटी ५० लक्षचा निधी प्राप्त करणेसाठी प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ३७४:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.२९ ह्या वॉर्डात महानगरपालिका ताब्यातील सिडको, एन-९, एच सेक्टर येथील दोन्ही नाल्यांच्या मध्ये पडीक जागा असून तेथे खुप घाण व कचरा पडलेला असतो याच्या बाजुलाच संत निरंकारी मंडळाचे सत्संग भवन आहे. त्यानुसार माझ्याकडे संत निरंकारी मंडळांची अशी मागणी आहे की, उपरोक्त जागा मंडळाला विकसीत करण्यासाठी दिल्यास तेथे ते वृक्षारोपन करून त्या जागेचे सुशोभीकरण करणार आहे. जेणे करून नागरीकांना याचा फायदा होईल.

संत निरंकारी मंडळ ही जागा स्वखर्चाने विकसीत करण्यास तयार आहे. यामुळे हि जागा संत निरंकारी मंडळास सुशोभीकरण करण्यासाठी देण्यात यावी. करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती शोभा नारायण वळसे **अनुमोदक:-**श्री.नितीन रमन चित्ते
मा.महापौर : प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.२९ या वॉर्डात महानगरपालिका ताब्यातील सिडको, एन-९, एच सेक्टर येथील दोन्ही नाल्यांच्या मध्ये पडीक जागा संत निरंकारी मंडळास स्वखर्चाने विकसीत व सुशोभीकरण करण्यासाठी देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ३७५:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, **जुने कामाचे नाव:-** वॉर्ड क्र.३४ अंतर्गत अण्णाभाऊ साठे सभागृह बांधणे ४५ लक्ष स्थायी समितीने शिफारस केलेले २०१७-१८ करीता नवीन कामाची यादी SCR-WARD-05-P.N.40 अ.क्र.२ या लेखाशिर्ष मधून रु.१० लक्ष वळती करून खालील कामाची मंजुरी देण्यात यावी.

**नवीन कामाचे नाव:-** वॉर्ड क्र.३४ मधील नागरीकांच्या घरातील ओला व सुका कचरा वेगवेगळा करण्यासाठी डस्टबिन्स् खरेदी करून वॉर्डातील नागरीकांना वाटप करण्यात याव्यात. या करीता रु.६ लक्षच्या रुपयाची डस्टबिन्स् खरेदी करण्यासाठी तरतुद करण्यात यावी. तसेच वॉर्डातील नागरीकांना

बसण्यासाठी बेंचेस व वॉर्डाअंतर्गत रस्त्यांसाठी नाव फलकबोर्ड बनविण्यासाठी रु.४ लक्षची तरतुद करण्यात यावी.

करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती संगिता सुभाष वाघुले **अनुमोदक:-**श्री.सिध्दार्थ संजय सिरसाट

मा.महापौर : प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.३४ अंतर्गत अण्णाभाऊ साठे सभागृह बांधणे ४५ लक्ष स्थायी समितीने शिफारस केलेले २०१७-१८ करीता नवीन कामाची यादी SCR-WARD-05-P.N.40 अ.क्र.२ या लेखाशिर्ष मधून वॉर्ड क्र.३४ मधील नागरीकांच्या घरातील ओला व सुका कचरा वेगवेगळा करण्यासाठी डस्टबिन्स् खरेदी करून वॉर्डातील नागरीकांना वाटप करण्याकरीता रु.६ लक्षच्या रुपयाची डस्टबिन्स् खरेदी करण्यास तसेच वॉर्डातील नागरीकांना बसण्यासाठी बेंचेस व वॉर्डाअंतर्गत रस्त्यांसाठी नाव फलकबोर्ड बनविण्यासाठी रु.४ लक्षची अशी एकुण रु.१० लक्षची रक्कम वळती करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ३७६:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या वॉर्ड क्र.३४ या वार्डास आरतीनगर, मिसरवाडी असे नांव देण्यात आलेले आहे. परंतु वॉर्ड क्र.३४ मधील अनेक रहिवासीयांकडे असलेल्या महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाच्या मतदान कार्डावर “नविन मिसरवाडी” असा उल्लेख असल्याने आरतीनगर-मिसरवाडी येथील रहिवासीयांना प्रत्येक निवडणूकीत तसेच अनेक शासकीय/अशासकिय योजनेमध्ये मतदान कार्ड रहिवासी पुरावा म्हणून आवश्यक असतांना आरतीनगर-मिसरवाडी व नविन मिसरवाडी या बाबींमुळे फार त्रास होत आहे. या वॉर्डातील रहिवासीयांच्या मागणी नुसार वॉर्ड क्र.३४ या वार्डाचे आरतीनगर-मिसरवाडी या नावा ऐवजी “नविन मिसरवाडी” असे नांव देण्यात यावे.

करीता, वॉर्ड क्र.३४, आरतीनगर-मिसरवाडी या वॉर्डाचे नांव बदलून वॉर्ड क्र.३४, “नविन मिसरवाडी” असे नामकरण करण्याकरीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती संगीता सुभाष वाघूले **अनुमोदक:-**श्री.खान फेरोज मोईनुद्दीन

मा.महापौर : प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.३४, आरतीनगर-मिसरवाडी या वॉर्डाचे नांव बदलून वॉर्ड क्र.३४, “नविन मिसरवाडी” असे नामकरण करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ३७७:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, नागरीकांच्या मागणीनुसार व त्यांच्या सोयीकरीता खालील नमुद तक्त्यामधील लेखाशिर्षक तसेच स्थळ बदलाचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| **सन २०१७-१८ मधील मा.सर्वसाधारण सभेने शिफारस केलेली कामे** | **र.रु.** (हजारात) | **च्या ऐवजी** | **र.रु.** |
|---|---|---|---|
| ३१.वॉर्ड क्र.६६, अजबनगर अंतर्गत साईबाबा मंदिर व संत एकनाथ सोसायटी येथील उद्यान विकसीत | १००० | १. कैलासनगर मनपा शाळेची दुरुस्ती करणे रंगरंगोटी करून इतर कामे करणे. | ५ लक्ष |

| | | | |
|---|---|---|---|
| करणे. GBR-Garden P.No.82 | | २. वॉर्ड क्र.६६ मधील विविध गल्ल्यातील ड्रेनेज लाईन दुरूस्ती करणे तसेच खुल्या गटारीवर चौकोनी ढापे टाकणे. | ५ लक्ष |
| Total | १००० | Total | १० लक्ष |

**सुचक:-**श्रीमती आशा नरेश भालेराव **अनुमोदक:-**श्री.मनोज आसाराम बल्लाळ
मा.महापौर : प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.६६, कैलासनगर,अजबनगर येथे खालील नमुद तक्त्यामधील लेखाशिर्षक बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| सन २०१७-१८ मधील मा.सर्वसाधारण सभेने शिफारस केलेली कामे | र.रु. (हजारात) | च्या ऐवजी | र.रु. |
|---|---|---|---|
| ३१.वॉर्ड क्र.६६, अजबनगर अंतर्गत साईबाबा मंदिर व संत एकनाथ सोसायटी येथील उद्यान विकसीत करणे. GBR-Garden P.No.82 | १००० | १. कैलासनगर मनपा शाळेची दुरुस्ती करणे रंगरंगोटी करून इतर कामे करणे. | ५ लक्ष |
| | | २. वॉर्ड क्र.६६ मधील विविध गल्ल्यातील ड्रेनेज लाईन दुरूस्ती करणे तसेच खुल्या गटारीवर चौकोनी ढापे टाकणे. | ५ लक्ष |
| Total | १००० | Total | १० लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ३७८:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्रमांक-११०, मयुरबन कॉलनी अंतर्गत शिवराज कॉलनी मधील महानगरपालिकेच्या हॉलमध्ये महानगरपालिकेतर्फे वाचनालय सुरू करण्यात येत आहे. या वाचनालयाला “हिंदुह्रदयसम्राट बाळासाहेब ठाकरे वाचनालय” असे नाव देण्यात यावे. अशी मागणी या परिसरातील नागरीकांनी केली आहे. नागरीकांच्या मागणीचा विचार करता शिवराज कॉलनी मधील महानगरपालिकेच्या वाचनालयास “हिंदुह्रदयसम्राट बाळासाहेब ठाकरे वाचनालय” असे नाव देण्यात यावे. करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती स्मिता दिगंबर घोगरे **अनुमोदक:-**श्री.विजय साईनाथ औताडे
मा.महापौर : प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्रमांक-११०, मयुरबन कॉलनी अंतर्गत शिवराज कॉलनी मधील महानगरपालिकेच्या वाचनालयास “हिंदुह्रदयसम्राट बाळासाहेब ठाकरे वाचनालय” असे नाव देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ३७९ :-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.४०, गणेशनगर अंतर्गत “हिंदु राष्ट्र चौक” या नावाने कमान उभारण्यासाठी तेथील नागरीकांची तीव्र स्वरुपाची बऱ्याच दिवसांची मागणी आहे.

करीता, “हिंदु राष्ट्र चौक” या नावाने कमान उभारण्यासाठीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.मकरंद माधवराव कुलकर्णी

**अनुमोदक:-**श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत,श्री.मोहन धन्नुलाल मेघावाले,श्री.शिवाजी भाऊसाहेब दांडगे

श्री.सयद मतीन :हिन्दू राष्ट्र हे शब्द संविधानाच्या विरुध्द आहे. विधी सल्लागार यांचा अभिप्राय घ्यावा.त्यानंतर निर्णय घ्यावा. हिन्दू राष्ट्र या शब्दाचा अर्थ काय होतो. माझे आब्जेक्शन आहे.

या वेळी डायस समोर जाऊन श्री.सयद मतीन बोलतात.

श्री.प्रमोद राठोड :डायस समोर येऊन असे बोलणे योग्य नाही. त्यांचे सभासद रद्द करावे. त्यांचे ऑब्जेक्शन असेल तर तसे पत्र द्यावे.

मा.महापौर :आपणास विनंती आपण जागेवर बसावे.

(या वेळी सुचना करूनही स.सदस्य जागेवर बसत नसल्याने त्यांचे सभासद रद्द करण्यात आले.त्यानंतर स.सदस्य श्री.मतीन सय्यद यांनी विषय पत्रिका फाडतात.)

श्री.विकास जैन :विषय पत्रिका फाडतात. त्यांचेवर गुन्हा दाखल करावा.

श्री.राजगौरव वानखेडे :स्टंटबाजी करतात. हे योग्य नाही. या चौकास नाव दिले फक्त कमान उभी करणार आहे.

मा.महापौर :सदस्यांनी असे वातावरण खराब करणे योग्य नाही. जी विषय पत्रिका फाडली ती जमा करून अतिरिक्त आयुक्त यांचेकडे द्यावी. जे काही सदस्यांनी हरकत केली, त्यांचेवर प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करावी. हा विषय मंजूर

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.४०, गणेशनगर अंतर्गत “हिंदु राष्ट्र चौक” या नावाने कमान उभारण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ३८०:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सिडको येथील माता मंदिर समोर “धर्मवीर संभाजी कॉलनी” या नावाने कमान तेथील नागरीकांची तीव्र स्वरुपाची बऱ्याच दिवसांची मागणी आहे.

करीता, “धर्मवीर संभाजी कॉलनी” या नावाने कमान उभारणीसाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.मकरंद माधवराव कुलकर्णी

**अनुमोदक:-**श्री.विकास रतनलाल जैन,श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत,श्री.शिवाजी भाऊसाहेब दांडगे

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सिडको येथील माता मंदिर समोर “धर्मवीर संभाजी कॉलनी” या नावाने कमान उभारण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ३८१:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्रीमती बेग तहेसिन फातेमा ह्या शिक्षीका म्हणुन सध्या जिल्हा परिषद मध्ये कार्यरत आहेत. त्यांनी औरंगाबाद महानगरपालिकेत शिक्षक म्हणुन कार्य करण्यासाठी शिक्षण विभागात अर्ज करून बदलीची मागणी केलेली आहे.

करीता. श्रीमती बेग तहेसिन फातेमा ह्या शिक्षक म्हणुन औरंगाबाद जिल्हा परिषदे मधून औरंगाबाद महानगरपालिके मध्ये शिक्षीका म्हणुन कार्य करण्यासाठी शिक्षण विभागात केलेला बदलीचा अर्ज स्विकारून त्यांना मनपा सेवेत सामावून घेण्यात यावे.

करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.अजीम अहेमद खान, श्रीमती शेख नरगीस सलीम

**अनुमोदक:-**श्री.सोहेल शकील शेख, श्री.सय्यद मतीन रशीद

मा.महापौर :शिक्षणाधिकारी यांचे काय मत आहे?

शिक्षणाधिकारी :त्यांना घेता येईल. याचा ठराव सभेसमोर ठेवून कार्यवाही करावी. असे मा.न्यायालयाने म्हटले आहे. फायनल निकाल बाकी आहे. सन २०१० ला त्यांनी अर्ज केला होता. त्या सिनीअर आहेत.

श्री.त्र्यंबक तुपे :किती लोकांनी अशी या पदावर नियुक्तीसाठी मागणी आलेली आहे? काही प्रकरण थांबलेले आहेत का?

शिक्षणाधिकारी :संचिका प्रोसेसमध्ये आहे. थांबलेले नाही. चार प्रकरण आहेत.

श्री.त्र्यंबक तुपे :असे प्रस्ताव या सभेने यापूर्वी थांबविले होते. त्यानंतर पुन्हा घ्यावे असा निर्णय घेतला का? शाळेला मागणी आहे अर्थात विद्यार्थी संख्या कमी आहे सर्व माहितीची टिप्पणी द्यावी. विद्यार्थी संख्या कमी आहे हे मा.कोर्टाला कळविले का? सर्व माहिती घेऊन कार्यवाही करावी. शिक्षक जास्त असतील तरी घ्यावे असे मा.कोर्टाने म्हटले नसेल. सर्व माहिती एकत्रित करावी व त्यानंतर यावे.

श्री.राजगौरव वानखेडे :अतिरिक्त किती शिक्षक आहे?

शिक्षणाधिकारी :ठराव काय झाला? बघून घेतो.

मा.महापौर :ज्या सुचना सदस्यांनी केल्या त्या विचारात घेऊन माहिती घ्यावी. मा.कोर्टाने काय आदेश केले सर्व माहिती घ्यावी व मा.आयुक्त व शिक्षणाधिकारी यांनी योग्य निर्णय घ्यावा. प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जिल्हा परिषद, औरंगाबाद येथील शिक्षिका श्रीमती बेग तहेसिन फातेमा यांना औरंगाबाद महानगरपालिकेच्या शाळेमध्ये शिक्षिका म्हणुन नियमानुसार सामावून घेण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ३८२ :-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पातील खालील कामे रद्द करून प्रभागात आवश्यक असणारी दुसरी कामे करणे बाबत लेखाशिर्ष बदलाचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | रद्द करावयाच्या कामाचे नाव | करावायाच्या कामाचे नाव |
|---|---|---|
| ०१ | सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पात प्रभाग क्रमांक-११४ जीबीआर झोन क्र.०८ पान क्र.६७ अ.क्र.१३ वर वॉर्ड क्र.११४ देवळाई सातारा अंतर्गत विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे. र.रु.५०.०० लक्ष | १. प्रभाग क्र.११४ देवळाई सातारा अंतर्गत विनायकराव हिवाळे पाटील यांचे घरापासून ते देवळाई गावातील मारोती मंदिरापर्यंत ड्रेनेज लाईन टाकणे र.रु.१५.०० लक्ष.<br>२. प्रभाग क्र.११४ मध्ये विविध विकास कामे करणे. र.रु.३५.०० लक्ष. |

**सुचक:-**श्री.अप्पासाहेब विनायक हिवाळे **अनुमोदक:-**श्रीमती माधुरी मिलींद देशमुख
मा.महापौर : प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.११४, देवळाई-सातारा अंतर्गत सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पातील खालील कामांच्या लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | रद्द करावयाच्या कामाचे नाव | करावायाच्या कामाचे नाव |
|---|---|---|
| ०१ | सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पात प्रभाग क्रमांक-११४ जीबीआर झोन क्र.०८ पान क्र.६७ अ.क्र.१३ वर वॉर्ड क्र.११४ देवळाई सातारा अंतर्गत विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे. र.रु.५०.०० लक्ष | १. प्रभाग क्र.११४ देवळाई सातारा अंतर्गत विनायकराव हिवाळे पाटील यांचे घरापासून ते देवळाई गावातील मारोती मंदिरापर्यंत ड्रेनेज लाईन टाकणे र.रु.१५.०० लक्ष.<br>२. प्रभाग क्र.११४ मध्ये विविध विकास कामे करणे. र.रु.३५.०० लक्ष. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ३८३:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.७३, रमानगर अंतर्गत विविध ठिकाणच्या अस्तित्वातील जुन्या एस.जी.नळाचे पाईप जीर्ण झालेले असल्यामुळे सदरील ठिकाणी जुन्या जलवाहिन्या बदलुन नविन जलवाहिन्या टाकण्यात याव्यात. सदरील कामासाठी र.रु.१०.०० लक्ष तरतुद ही दलित वस्ती/समाज कल्याण सुधार योजने अंतर्गत करण्यात यावी.

करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती विजया संजय बनकर **अनुमोदक:-**श्री.राहुल पंढरीनाथ सोनवणे
मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.७३, रमानगर अंतर्गत विविध ठिकाणच्या जुन्या जलवाहिन्या बदलुन नविन जलवाहिन्या टाकण्याच्या कामासाठी र.रु.१०.०० लक्षची तरतुद दलित वस्ती/समाज कल्याण सुधार योजने अंतर्गत करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ३८४:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, अर्थसंकल्प सन २०१७-१८ मध्ये वॉर्ड क्र.१०, रोजेबाग अंतर्गत असलेल्या विकास कामांचे लेखाशिर्ष खालीलप्रमाणे बदलणे आवश्यक आहे. करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | अर्थसंकल्प सन २०१७-१८ मधील लेखाशिर्ष | नवीन कामाचे लेखाशिर्ष |
|---|---|---|
| ०१. | रोजेबाग येथील श्री.पटेल यांचे घरापासून ते क्रिसेंट सोसायटी पर्यंत २०० एम.एम.डी.आय. नवीन पाईप लाईन टाकणे. र.रु.२५.०० लक्ष.<br>पान क्र.एससीआर-पा.क्र.३६ अ.क्र.३ | वॉर्ड क्र.१० येथील एकता कॉलनी एस.बी.एच कॉलनी, मॉडेल कॉलनी, प्रोफेसर कॉलनी, मयुरबन कॉलनी येथे जलवाहीनी टाकणे. र.रु.२५.०० लक्ष |
| ०२. | अभिज्योत विद्यालयाजवळील मनपाच्या खुल्या जागेस संरक्षीत भींत बांधणे र.रु.४० लक्ष मधून उर्वरीत र.रु.१५.०० लक्ष.पान क्र.३ अ.क्र.१३ | वॉर्ड क्र.१० शिवछत्रपती नगर येथे ओपन स्पेसमध्ये लालमातीची तालीम बांधणे.र.रु.१५.०० लक्ष. |
| ०३. | १. भारतमातानगर एन-१२ शिवछत्रपतीनगर | वार्ड क्र.१० भारतमातानगर येथे |

| | | |
|---|---|---|
| | रोजेबाग परिसर सिध्दार्थनगर येथे नवीन हातपंप टाकणे. र.रु.१०.०० लक्ष उर्वरित र.रु.०५.०० लक्ष पान क्र.३६ अ.क्र.५.<br>२. रोजेबाग एन-१२ येथील समाज मंदीराची दुरूस्ती करणे व रंगरंगोटी करणे. र.रु.१०.०० लक्ष उर्वरित र.रु.०५.०० लक्ष पान क्र.३२ अ.क्र.२ | श्री.राणेसर यांच्या घरापासून ते श्री.विनायक काळे यांच्या घरा समोरील ओपन स्पेसवर पेव्हर ब्लॉक बसविणे. र.रु.१०.०० लक्ष. |

**सुचक:-**श्री.मोहन धन्नुलाल मेघावाले **अनुमोदक:-**श्रीमती आशा नरेश भालेराव

मा.महापौर : प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अर्थसंकल्प सन २०१७-१८ मध्ये वॉर्ड क्र.१०, रोजेबाग येथे विविध विकास कामांचे लेखाशिर्ष खालीलप्रमाणे बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | अर्थसंकल्प सन २०१७-१८ मधील लेखाशिर्ष | नवीन कामाचे लेखाशिर्ष |
|---|---|---|
| ०१. | रोजेबाग येथील श्री.पटेल यांचे घरापासून ते क्रिसेंट सोसायटी पर्यंत २०० एम.एम.डी.आय. नवीन पाईप लाईन टाकणे. र.रु.२५.०० लक्ष.<br>पान क्र.एससीआर-पा.क्र.३६ अ.क्र.३ | वॉर्ड क्र.१० येथील एकता कॉलनी एस.बी.एच कॉलनी, मॉडेल कॉलनी, प्रोफेसर कॉलनी, मयुरबन कॉलनी येथे जलवाहीनी टाकणे. र.रु.२५.०० लक्ष |
| ०२. | अभिज्योत विद्यालयाजवळील मनपाच्या खुल्या जागेस संरक्षीत भींत बांधणे र.रु.४० लक्ष मधून उर्वरीत र.रु.१५.०० लक्ष.पान क्र.३ अ.क्र.१३ | वॉर्ड क्र.१० शिवछत्रपती नगर येथे ओपन स्पेसमध्ये लालमातीची तालीम बांधणे.र.रु.१५.०० लक्ष. |
| ०३. | १. भारतमातानगर एन-१२ शिवछत्रपतीनगर रोजेबाग परिसर सिध्दार्थनगर येथे नवीन हातपंप टाकणे. र.रु.१०.०० लक्ष उर्वरित र.रु.०५.०० लक्ष पान क्र.३६ अ.क्र.५.<br>२. रोजेबाग एन-१२ येथील समाज मंदीराची दुरूस्ती करणे व रंगरंगोटी करणे. र.रु.१०.०० लक्ष उर्वरित र.रु.०५.०० लक्ष पान क्र.३२ अ.क्र.२ | वार्ड क्र.१० भारतमातानगर येथे श्री.राणेसर यांच्या घरापासून ते श्री.विनायक काळे यांच्या घरा समोरील ओपन स्पेसवर पेव्हर ब्लॉक बसविणे. र.रु.१०.०० लक्ष. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ३८५:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, अर्थसंकल्प सन २०१७-१८ मध्ये वॉर्ड क्र.१०, रोजेबाग अंतर्गत असलेल्या विकास कामांचे लेखाशिर्ष खालीलप्रमाणे बदलणे आवश्यक आहे. करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | अर्थसंकल्प सन २०१७-१८ मधील लेखाशिर्ष | नवीन कामाचे लेखाशिर्ष |
|---|---|---|
| ०१ | विद्यालंकार शाळा एन-१२ ते सत्यविष्णू चौक पर्यंतची नाली दुरुस्ती करणे व आवश्यक ठिकाणी ढापे टाकणे. र.रु.२५.०० | वॉर्ड क्र.१० येथे विविध ठिकाणच्या ओपन स्पेसवर पेव्हर ब्लॉक बसविणे व परिसर सुशोभित करणे. तसेच विविध ठिकाणच्या |

| | | |
|---|---|---|
| | लक्ष. पान क्र.३५, अ.क्र.२ | रस्त्याच्या पाथवे वर पेव्हर ब्लॉक बसविणे. र.रु.२५.०० लक्ष. |

**सुचक:-**श्री.मोहन धन्नुलाल मेघावाले **अनुमोदक:-**श्रीमती मनिषा बाळासाहेब मुंडे
मा.महापौर : प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अर्थसंकल्प सन २०१७-१८ मध्ये वॉर्ड क्र.१०, रोजेबाग येथे विविध विकास कामांचे लेखाशिर्ष खालीलप्रमाणे बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | अर्थसंकल्प सन २०१७-१८ मधील लेखाशिर्ष | नवीन कामाचे लेखाशिर्ष |
|---|---|---|
| ०१ | विद्यालंकार शाळा एन-१२ ते सत्यविष्णू चौक पर्यंतची नाली दुरुस्ती करणे व आवश्यक ठिकाणी ढापे टाकणे. र.रु.२५.०० लक्ष. पान क्र.३५, अ.क्र.२ | वॉर्ड क्र.१० येथे विविध ठिकाणच्या ओपन स्पेसवर पेव्हर ब्लॉक बसविणे व परिसर सुशोभित करणे. तसेच विविध ठिकाणच्या रस्त्याच्या पाथवे वर पेव्हर ब्लॉक बसविणे. र.रु.२५.०० लक्ष. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ३८६:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.३८ चिकलठाणा एमआयडीसी अंतर्गत मसनतपुर, शहानगर व नारेगाव वॉर्ड क्रमांक-३५ अंतर्गत असलेले हे रस्ते अत्यंत खराब झाल्यामुळे नागरीकांना या रस्त्याने चालणेही त्रासदायक झाले आहे. नागरीक वेळोवेळी रस्त्याच्या दुरूस्तीसाठी मागणी करीत आहे.

तरी चिकलठाणा एमआयडीसी अंतर्गत मसनतपुर, शहानगर व नारेगाव वॉर्ड क्रमांक-३५ अंतर्गत असलेल्या रस्त्याचे कॉंक्रेटिकरण करण्यासाठी सन २०१८-१९ शासनाकडून मिळणाऱ्या मुलभूत सुविधा अंतर्गत प्राप्त अनुदान ५० टक्के व महानगरपालिका हिश्श्यातून ५० टक्के रक्कमेतून वरील रस्त्याचे कॉंक्रेटीकरण करणे करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.मलके गोकुलसिंग संपतसिंग **अनुमोदक:-**श्री.राजु रामराव शिंदे
मा.महापौर : प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.३८ चिकलठाणा एमआयडीसी अंतर्गत मसनतपुर, शहानगर व नारेगाव वॉर्ड क्रमांक-३५ अंतर्गत असलेल्या रस्त्याचे कॉंक्रेटिकरण करण्यासाठी सन २०१८-१९ शासनाकडून मिळणाऱ्या मुलभूत सुविधा अंतर्गत प्राप्त अनुदान ५० टक्के व महानगरपालिका हिश्श्यातून ५० टक्के रक्कमेतून वरील रस्त्याचे कॉंक्रेटीकरण करणेच्या कामास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ३८७:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, रोजेबाग, गितानगर येथील महानगरपालिकेच्या मालकीची शाळा भाडेतत्वावर मिळणेसाठी अलताज एज्युकेशन ॲण्ड वेलफेअर सोसायटी, औरंगाबाद यांनी विनंती केली असून यापुर्वी महानगरपालिकेने औरंगाबाद महानगरपालिकेच्या विविध ठिकाणी असलेल्या शाळा भाडेतत्वावर देणेसाठी निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्या अनुषंगाने अलताज एज्युकेशन ॲण्ड वेलफेअर सोसायटी या संस्थेस निविदा दराने महानगरपालिकेची रोजेबाग, गितानगर येथील शाळा

भाडेतत्वावर देण्यात यावी. सदरची शाळा ही सद्यस्थितीत बंद असून महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती लक्षात घेता, सदरची शाळा संस्थेस भाडेतत्वावर देऊन त्या इमारतीवरील देखभालीचा खर्च, विद्युत देयक व इतर खर्चाची बचत होऊन महानगरपालिकेस आर्थीक उत्पन्नाचा स्त्रोत निर्माण होईल.

त्यामुळे सदरची शाळा महिला व मुले यांना तांत्रिक प्रशिक्षण देण्यासाठी अलताज एज्युकेशन ॲण्ड वेलफेअर सोसायटी या संस्थेस देण्यात यावी.

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.सिद्दीकी नासेर तकीउद्दीन **अनुमोदक:-**श्री.गंगाधर नामदेव ढगे

श्री.अयुब खान :वार्ड क्रमांक ११ मध्ये येते. एक वर्षापासून शाळा बंद आहे. प्रस्ताव स्थगीत करावा. त्या ठिकाणी आरोग्य केंद्र करावे.

मा.महापौर :हा प्रस्ताव रद्द करण्यात येतो.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तुत प्रस्ताव रद्द करण्यात येतो.

**<u>विषय क्रमांक ३८८:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.६० मध्ये अनेक भागात दुर्गंधीयुक्त पाणी येत असल्याने पाईप लाईन बदलणे व घाण पाण्याची समस्या दुर करण्यास मी वारंवार तक्रार केलेली आहे. या प्रकरणात मी उपोषणास बसणार होतो. परंतु संबंधीत अधिकाऱ्यांकडून मला काम तात्काळ करण्यात येईल, असे आश्वासन मिळाले होते. परंतु आज पर्यंत काम करण्यात आलेले नाही. त्यामुळे माझ्या वॉर्डात नळांना कमीत कमी ५ ते १० मिनीटे गढुळ व दुर्गंधीयुक्त पाणी येते. रहिवासी हे पाणी साठवून ठेवण्यास योग्य नसल्याने नाईलाजास्तव गटारीत सोडून देतात. ते पाणी गटारीतून रस्त्यावर येते व अनेक खराब झालेल्या पाणी पुरवठा लाईनच्या गळतीमुळे अनेक ठिकाणी पाणी साचते.

अशाच गढुळ व दुर्गंधीयुक्त गल्लीत जमा झालेल्या पाण्यामुळे पाय घसरून पडल्याने दिनांक ११.०३.२०१८ रोजी गल्ली नं.सी.-१९ न्यु इंदिरानगर, बायजीपुरा मधील रहिवासी साहिल रशिद पठाण (वर्ग १० वीची परिक्षा देणारा विद्यार्थी) याचा मृत्यु झालेला आहे. संबंधीत हा गरीब कुटूंबातील मुलगा होता. तो शिक्षणासोबत तो काहीना काही काम करून घराच्या दैनंदिनी उदरनिर्वाहाच्या खर्चास हातभार लावीत होता. त्यामुळे या कुटूंबीयाचा कर्ता मुलगा ही गेलेला आहे.

करीता मी वारंवार तक्रार करूनही वॉर्डातील पाण्याची पाईप लाईन बदलण्यात आलेली नाही व घाण पाण्याची समस्या दुर करण्यात आलेली नाही. त्यामुळे साचलेल्या पाण्यात पडल्याने गल्ली नं.सी.१९ न्यु, इंदिरानगर, बायजीपुरा मधील रहिवासी मयत साहिल रशिद पठाण यांच्या कुटूंबीयास मनपा तर्फे किमान रु.०५ लक्ष रुपयाची आर्थिक मदत करण्यासाठीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.शेख जफर अख्तर **अनुमोदक:-**श्री.दिलीप गंगाधर थोरात

श्री.जफर खान :घाण पाणी जमा होते. त्या ठिकाणी एक मुलागा पाय घसरून पडला. त्यांचा मृत्यू झाला. तो मुलगा काम करून घराचा उदरनिर्वाह भागत असे. या मुलाच्या कुटूंबीयांना पाच लक्ष आर्थीक मदत मंजूर करावे.

मा.महापौर :हा विषय मंजूर तातडीने कार्यवाही करावी.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.६० मधील गल्ली नं.सी.१९ न्यु, इंदिरानगर, बायजीपुरा येथे गढुळ व दुर्गंधीयुक्त पाणी गल्लीत जमा झाल्यामुळे पाय घसरून पडल्याने मयत झालेल्या साहिल रशिद

पठाण याच्या कुटूंबीयाला मनपातर्फे रु.०५ लक्षची आर्थिक मदत करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ३८९:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.३८, मसनतपुर या भागामध्ये ५० टक्के पेक्षा जास्त दलित वस्ती असून बऱ्याच वर्षापासून हा भाग विकास कामापासून वंचित आहे. करीता, शासनाच्या दलित वस्ती सुधार योजनेतून विविध विकास कामे करण्याकरीता रु.२५ लक्षचा निधी प्राप्त होण्यासाठी प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविण्यात यावा.

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.राजु रामराव शिंदे **अनुमोदक:-**श्री.मलके गोकुलसिंग संपतसिंग

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.३८, मसनतपुर येथील दलित वसाहतींमध्ये शासनाच्या दलित वस्ती सुधार योजनेतून विविध विकास कामे करण्याकरीता रु.२५ लक्षचा निधी प्राप्त होण्यासाठी प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ३९०:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.४४ मधील रोशनगेट या रहिवासी भागात दोन्ही बाजुने वाहतुक सुरू आहे. परंतु सदरील गेटला दोन्ही बाजुने लहान दगडी भिंत सुशोभिकरण अंतर्गत बांधण्यात आलेली आहे. परंतु सर्व बाजुस असलेली भिंत जास्त प्रमाणात वळणाच्या रस्त्यात येत असल्याने या ठिकाणी अपघात होत आहे. करीता, रोशनगेटच्या पुर्व बाजुची दगडी भिंत तोडून तेथील गोलाकार बांधकाम कमी करण्यात यावे जेणेकरून वळण रस्त्यावर अपघात होणार नाही.

तरी, रोशनगेटच्या पुर्व बाजुची गोलाकार दगडी लहान भिंत तोडून आत मध्ये गोलाकार बांधकाम करण्यासाठीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती साजेदा फारुखी सईद फारुखी **अनुमोदक:-**श्री.खान फेरोज मोईनुद्दीन

मा.महापौर : प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.४४, रोशनगेटच्या पुर्व बाजुची दगडी भिंत तोडून आत मध्ये गोलाकार बांधकाम करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ३९१:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.४४ मधील रोशनगेट ते कटकटगेट या रस्त्यास आतापर्यंत कोणाचेही नाव दिलेले नाही. येथील रहिवासीयांच्या मागणीनुसार सदरील रस्त्यास “हजरत उमर बिन खत्ताब (रजि)” असे नाव देण्यासाठीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती साजेदा फारुखी सईद फारुखी **अनुमोदक:-**श्री.खान फेरोज मोईनुद्दीन

मा.महापौर :प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.४४ मधील रोशनगेट ते कटकटगेट या रस्त्यास “हजरत उमर बिन खत्ताब (रजि)” असे नाव देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ३९२:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्रीमती किर्ती तुकाराम गायकवाड स.शि.मनपा मराठी प्राथमिक शाळा क्र.१५ एसआरपीएफ कॅम्प अमरावती या ठिकाणी गेल्या ०७ वर्षापासून सहशिक्षीका या पदावर कार्यरत असून त्यांचे पती श्री.संदीप तोताराम दळवी हे विभागीय कृषी सहसंचालक कार्यालय, औरंगाबाद अंतर्गत भोकरदन या ठिकाणी कृषी सहाय्यक या पदावर कार्यरत आहेत. श्रीमती किर्ती तुकाराम गायकवाड यांची नियुक्ती ही मराठी माध्यम खुला प्रवर्गातून झालेली आहे.

त्यांनी त्यांची एकतर्फी बदली औरंगाबाद महानगरपालिकेतील शाळेत स.शि.पदावर करण्यात यावी. अशी विनंती महानगरपालिकेस केलेली आहे. त्यांचे पती भोकरदन येथे शासकीय सेवेत असल्याने त्यांची बदली महानगरपालिकेच्या शाळेत करण्यात यावी.

करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.रामेश्वर बाबुराव भादवे **अनुमोदक:-**श्री.विजय साईनाथ औताडे

मा.महापौर : प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्रीमती किर्ती तुकाराम गायकवाड, सहशिक्षिका, मनपा मराठी प्राथमिक शाळा क्र.१५ एसआरपीएफ कॅम्प अमरावती यांची एकतर्फी बदली औरंगाबाद महानगरपालिकेतील शाळेत सहशिक्षिका या पदावर करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**ऐनवेळीचे विषय**

**विषय क्रमांक ३९३:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, केंद्र शासनाचे शहरी विकास मंत्रालयाचे पत्र क्रं/के/१४०११/१५/२०१३-युडी-१ दिनांक २४ डिसेंबर २०१३ च्या Office Memorandum नुसार औरंगाबाद महानगरपालिकेच्या भुयारी गटार योजनेच्या रक्कम रुपये ३६५.६९ कोटीच्या प्रकल्प प्रस्तावास मंजुरी मिळालेली आहे.

केंद्र शासनाच्या लहान व मध्यम शहराच्या पायाभुत सोयी-सुविधांचा विकास कार्यक्रम (uidssmt) या योजने अंतर्गत केंद्र सरकारकडुन एकुण प्रकल्प किमंतीच्या ८० टक्के म्हणजेच रुपये २९२.५५ कोटी तसेच राज्य शासनाकडुन एकुण प्रकल्प किमंतीच्या १० टक्के म्हणजेच रुपये ३६.५७ कोटी असे एकुण रक्कम रुपये ३२९.१२ कोटी अनुदान स्वरुपात महानगरपालिकेस मिळण्याचे प्रस्तावित होते.तसेच या अंतर्गत उर्वरीत १० टक्के रक्कम रुपये ३६.५७ कोटीची तजविज महानगरपालिकेस करावी लागणार होती.परंतु केंद्र शासनाने माहे जुन २०१५ अंतर्गत अटल नवीकरण आणि शहरी परीवर्तन मिशन (Atal Mission for Rejuvenation\and Urban Transformation (AMRUT) योजना सुरु केलेली आहे. महानगरपालिकेची मंजुर मलनिःसारण योजना ही (Transition Phase) मधिल असल्याने महानगरपालिकेच्या या योजनेचा समावेश अमृत या नविन योजने अंतर्गत केंद्र शासनाने केलेला आहे.

अमृत योजनेच्या वित्तीय आकृतीबंधामुळे महानगरपालिकेस केंद्रशासना कडील ६० टक्के व राज्य शासनाचे २० टक्के असे एकत्रित रुपये २९२.५५ कोटीचे खालील नुसारचे सुधारीत आर्थिक अनुदान प्राप्त झालेले आहे. उर्वरीत २० टक्के रुपये ७३.१३ कोटी महानगरपालिकेस मनपा हिस्सा म्हणुन भरणा करावा लागणार आहे.

| एकुण मंजुर प्रकल्प किमंत | केंद्र शासन हिस्सा प्राप्त अनुदान (एकुण प्रकल्प | राज्य शासन हिस्सा प्राप्त अनुदान (एकुण प्रकल्प किमंतीच्या | महानगरपालिकेचा हिस्सा (एकुण प्रकल्प किमंतीच्या २० टक्के. |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| | किमंतीच्या ६० टक्के) | २० टक्के) | |
| रुपये ३६५.६८८९ कोटी. | रुपये २१९.४१३३४ कोटी | रुपये ७३.१३७७८ कोटी | रुपये ७३.१३७७८ कोटी |

महानगरपालिकेने मनपा हिस्सा रुपये ७३.१३ कोटी अंतर्गत रुपये १८.२८ कोटीचा भरणा प्रकल्प करीता उघडण्यात आलेल्या स्वतंत्र बँक खात्या अंतर्गत केलेला आहे.त्यामुळे महानगरपालिकेस उर्वरीत रुपये ५४.८५७७८ कोटीची आर्थिक तजविज प्रकल्प पुर्णत्वा करीता करावी लागणार आहे.

तसेच सदर प्रकल्प करीता रितसर निविदा सुचना प्रसिध्द करुन कार्यवाही अंती प्रकल्पाचे मक्तेदार म्हणुन मे.खिल्लारी इंन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.आणि घारपुरे इंजिनियरिंग ॲन्ड कंन्स.प्रा.लि (जेव्ही) यांच्या रुपये ४६४.०० कोटीच्या निविदा दरास मा.स्थायी समिती ठराव क्रमांक २३१ दिनांक २९.४.२०१४ अन्वये मंजुरी प्राप्त झालेली आहे.त्यामुळे महानगरपालिकेस निविदा दरा मधील फरक रुपये ९८.३१ कोटीची अतिरिक्त आर्थिक तरतुद करावी लागणार आहे.

महानगरपालिकेस सदरील मलनिःसारण प्रकल्प पुर्ण करणे करीता उक्त रुपये ५४.८५७७८ कोटीच्या रक्कमेचे तसेच निविदा दरा मधील फरका करीता रु.९८.३१ कोटी असे एकत्रित रुपये १५३.१६७७८ कोटीचे आर्थिक नियोजन करणे आवश्यक आहे.

मा.आयुक्त तथा संचालक,नगरपरीषद प्रशासन संचालनालय मुंबई यांचे कडे दिनांक १.९.२०१६ रोजी आयोजीत विशेष बैठकी अंतर्गत कर्ज उभारणी करीता शासन पत्र क्रमांक/संकिर्ण-१००७/कर्ज व्यवस्थापन प.क्रं/३४५/नवि-२६.दिनांक १७ डिसेंबर २००७ नुसार आवश्यक असणारी माहिती /वित्तीय आकृतीबंध शासनास सादर करण्यात आलेला आहे.या अंतर्गत रुपये ५४.८५७७८ कोटीची तजविज औरंगाबाद महानगरपालिकेच्या महसुली उत्पन्नातुन करण्यात येणार असल्याचे तसेच उर्वरीत रुपये ९८.३१ कोटी हुडको या वित्तीय संस्थेकडुन घेण्याचे नियोजन करण्यात येत असल्याचे प्रशासना मार्फत कळविण्यात आलेले होते.

महानगरपालिकेने राज्य शासनास सादर केलेल्या वित्तीय आकृतीबंधाच्या अनुषंगाने रुपये ९८.३१ कोटी कर्ज स्वरुपात हुडको या वित्तीय संस्थेकडुन घेणे बाबतचा धोरणात्मक प्रशासकीय प्रस्ताव दिनांक १६.११.२०१६ पासुन मा.सर्वसाधारण सभेसमोर विचारार्थ व निर्णयास्तव सादर करणे करीता सादर करण्यात आलेला होता. त्या अनुषंगाने मा.सर्वसाधारण सभेने विषय क्रमांक १७० दिनांक १७.१२.२०१७ अन्वये सदरचा धोरणात्मक प्रस्ताव मा.सभेच्या पटलावर विचारार्थ व निर्णयास्तव घेतलेला होता.

मा.प्रधान सचिव (नवि २) यांचे कडील दिनांक ९.११.२०१७ रोजीच्या प्रकल्प विशेष आढावा बैठकीतील सुचने प्रमाणे कार्यवाही होणेच्या अनुषंगाने प्रशासनाने प्रकल्प पुर्णत्वा करीता केलेल्या आर्थिक नियोजना बाबतचा/मलनिःसारण योजने बाबतचा प्रगती अहवाल/प्रकल्प पुर्णत्वा करीता येणा-या अडचणी बाबतचा सविस्तर अहवाल मा.प्रधान सचिव (नवि २) यांचे कडील प्रकल्प आढावा बैठक दिनांक १४.२.२०१८ अंतर्गत सादर करण्यात आलेला होता.

सदरील बैठकी अंतर्गत सह सचिव (नवि ३३) यांनी महानगरपालिकेस पायाभुत प्रकल्प पुर्णत्वा करीता येत असलेल्या आर्थिक अडचणी संदर्भाने महाराष्ट्र नागरी पायाभुत विकास कं.लि (MUIDCL) या शासन अंगीकृत संस्थेकडुन कर्ज उपलब्ध करुन घेणे बाबतचा सविस्तर प्रस्ताव सादर करणे बाबत सुचना केलेली आहे.

परंतु औरंगाबाद महानगरपालिका क वर्गात येत असल्याने महाराष्ट्र नागरी पायाभुत विकास कं.लि (MUIDCL) यांचे कडील मार्गदर्शक तत्वाच्या अनुषंगाने/महाराष्ट्र नागरी पायाभुत विकास कंपनी लि.यांचे कडील पत्र क्रं/MuIF/PFF-LOAN-GRANT MIX/ULBS/2017/120 दिनांक २१.९.२०१७ च्या पत्रान्वये औरंगाबाद महानगरपालिकेस पायाभुत प्रकल्प करीता कर्ज/अनुदान देय नसल्याबाबत बैठकीत नमुद करण्यात आलेले होते.परंतु सह सचिव(नवि ३३) यांनी विशेष बाब म्हणुन शहरातील

मलनिःसारण प्रकल्प पुर्ण करणे करीता औरंगाबाद महानगरपालिकेस कर्ज उपलब्ध करुन देणार असल्या बाबत कळविलेले आहे.

महानगरपालिकेस महाराष्ट्र नागरी पायाभुत विकास कं.लि (MUIDCL) च्या आर्थिक क्षमतेचा विचार करता प्रत्येक आर्थिक वर्षात रु.२५ ते ३०.०० कोटी या प्रमाणे कर्ज मिळण्याचे प्रस्तावित आहे.तसेच या अंतर्गत किमान रु.५.०० कोटी प्रत्येक आर्थिक वर्षात अनुदान स्वरुपात मिळण्याची शक्यता आहे.महानगरपालिकेच्या कर्ज रक्कमेस वार्षिक ७ टक्के दराने व्याज आकारणी MUIDCL यांचे मार्फत करण्यात येणार असुन सदरील वित्तीय संस्था शासन अंगीकृत असल्याने महानगरपालिकेस कोणत्याही प्रकारची मालमत्ता हमी म्हणुन तारण ठेवावी लागणार नाही.महानगरपालिकेस देण्यात येणा-या कर्ज रक्कमेची परतफेड/कपात राज्य शासन औरंगाबाद महानगरपालिकेस नियमित स्वरुपात देत असलेल्या जीएसटी च्या अनुदानातुन विहीत हप्त्यानुसार करणार आहे.

प्रकल्पाचे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार मे.फोट्रेस ॲडव्हायजरी सर्व्हिसेस मुंबई यांनी सुधारीत रुपये ४१८.०० कोटी मध्ये प्रकल्पातील विहीत कामे पुर्ण करणे बाबतचे सुधारीत नियोजन महानगरपालिकेस सादर केलेले आहे.तसेच महानगरपालिकेने मनपा हिस्सा रुपये ७३.१३ कोटी अंतर्गत रुपये १८.२८ कोटीचाच भरणा प्रकल्प करीता उघडण्यात आलेल्या स्वतंत्र बँक खात्या अंतर्गत केलेला आहे. त्यामुळे महानगरपालिकेस उर्वरीत रुपये ५४.८५७७८ कोटीची आर्थिक तजविज प्रकल्प पुर्णत्वा करीता करावी लागणार आहे.परंतु महानगरपालिकेस केंद्र व राज्य शासना कडील प्राप्त अनुदान रक्कमेवर आज पावेतो रुपये २०.४० कोटी इतके व्याज मिळालेले आहे.शासन परीपत्रक क्रमांक/संकीर्ण/३४१६/प्र.क्रं.४०/नवि-०४दिनांक २७ मे २०१६ च्या अनुषंगाने ज्या योजनेसाठी विविध टप्प्यांमध्ये अनुदान मंजुर केले जाते व ज्या योजनेमध्ये राज्य शासना सोबतच स्थानिक स्वराज्य संस्थेचा हिस्सा देखील अंतर्भुत असतो अशा योजनेसाठी मंजुर केलेल्या निधीवर प्राप्त व्याजाची रक्कम त्याच योजनेमध्ये शासनाच्या पुर्व मान्यतेने स्थानिक स्वराज्य संस्थेचा हिस्सा भरण्यासाठी किंवा योजनेच्या खर्चात झालेला वाढीव खर्च भागविण्यासाठी वापरता येणार असल्याने औरंगाबाद महानगरपालिकेस या योजने अंतर्गत बँकेत जमा रक्कमेवरील व्याज स्वरुपात मिळालेले रक्कम रुपये २०.४० कोटी मनपा हिस्सा अंतर्गत वापरण्यात आल्यास फक्त रुपये ३४.४५ कोटी कर्ज स्वरुपात MUIDCL / HUDCO यांचे मार्फत कर्ज स्वरुपात घ्यावे लागणार आहे.

महानगरपालिकेस सुधारीत रुपये ४१८.०० कोटी प्रस्तावाच्या अनुषंगाने उक्त बाबी नुसार निविदा दरा मधिल फरका करीता आवश्यक रुपये ९८.३१ कोटी ऐवजी रुपये ५२.७५ कोटी तसेच योजनेतील मनपा हिस्सा रुपये ५४.८५ कोटी ऐवजी रुपये ३४.४५ कोटी असे एकत्रित रुपये ८७.२० कोटीची आवश्यकता आहे.

सह सचिव (नवि ३३) यांचे कडील बैठकीतील सुचनेप्रमाणे उक्त रुपये ८७.२० कोटी रक्कमेचे नियोजन महानगरपालिकेस शासन अंगीकृत महाराष्ट्र नागरी पायाभुत विकास कं.लि (MUIDCL) यांचे मार्फत त्यांचे कडील विहीत अटी व शर्तीच्या अनुषंगाने किंवा हुडको या वित्तीय संस्थेकडुन करणे आवश्यक आहे.

करीता महानगरपालिकेस प्रकल्पाचे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांनी सादर केलेल्या रुपये ४१८.०० कोटीच्या नियोजना नुसार प्रकल्पातील विहीत उपांगे पुर्णत्वा करीता वित्तीय नियोजन करण्यात आले असून या अंतर्गत वरील प्रमाणे रुपये ८७.२० कोटी महाराष्ट्र नागरी पायाभुत विकास कं.लि (MUIDCL) यांचे कडुन प्रत्येक आर्थिक वर्षात किमान रुपये २५ ते ३० कोटी नुसार कर्ज स्वरुपात घेऊन वित्तीय उभारणी करणे, प्रकल्प पुर्णत्वा करीता आवश्यकता भासल्यास हुडको या वित्तीय संस्थेकडुन त्यांचे कडील विहीत अटी व शर्तीच्या अनुषंगाने कर्ज स्वरुपात रक्कमेची उभारणी करणे, प्रकल्प पुर्णत्वा करीता वेळोवेळी केंद्र व राज्य शासना कडील प्राप्त परीपत्रक/शासन निर्णय/सुचने नुसारची कार्यवाही करणे, MUIDCL/HUDCO कर्ज संदर्भाने आवश्यक करारनामे/हमीपत्र करणे, कर्ज परतफेड संदर्भाने आर्थिक नियोजन करणे, इत्यादी करीता आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद

यांना प्राधिकृत करणे बाबतचा उक्त नुसारचा सविस्तर धोरणात्मक प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

श्री.प्रमोद राठोड :कर्ज किती घ्यायचे, या विषयावर मा.आयुक्तांनी काय अभ्यास केला? मा.आयुक्त नाही कर्ज घेऊ नये असे आम्ही सांगतो.

श्री.राजगौरव वानखेडे :आर्थीक परीस्थिती बिकट आहे. हप्ते देणेची परिस्थिती मनपाची नाही. शासनाकडून निधी आणावा.

श्री.प्रमोद राठोड :जे आयुक्त येतील त्यांचे समक्ष खुलासा घ्यावा. यासाठी स्पेशल सभा घ्यावी.

श्री.आत्माराम पवार :सदस्य संख्या कमी आहे. मनपासाठी हा विषय चुकीचा आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :नवीन आयुक्त येतील तेंव्हा घ्यावे. १५ दिवस थांबावे.

श्री.अजीम अहेमद :नवीन आयुक्त येतील तेंव्हा हा विषय घ्यावा.

श्री प्रमोद राठोड :नवीन मा.आयुक्त येऊ द्यावे त्यानंतर हा विषय घ्यावा. आणखी रु.१०-२० कोटी यातील कमी होऊ शकतात.

श्री.त्र्यंबक तुपे :सुरूवातीला रु.९८ कोटीचा प्रस्ताव होता. मला माहिती दिली रु.५३ कोटीच लागणार आहे आता रु.८७ कोटीचा विषय आला. एकूण मनपाकडे कर्ज रु.१७६ कोटी आहे. १२-१३ पासून ठेकेदाराची देयके रु.११० कोटी देणे आहे. तीन कोटीचा हप्ता कर्जामध्ये जातो. एलइडीचे रु.१० लक्ष पर-डे भरणा करतो. कर्मचारी घेतले. तो खर्च आहे उत्पन्न बघीतले तर वाईट परीस्थिती आहे. मोठे देणे झाले. पगार करणे अवघड होईल. वसुली कमी येते. असे असतांना याचा किती हप्ता द्यावा लागणार आहे. उत्पन्न कसे वाढविता येईल, त्या विषयी प्रयत्न होणे आवश्यक होते. सर्व परीस्थिती विचारात घेऊन निर्णय घ्यावा. अनेक मालमत्ता कर संदर्भात मा.कोर्ट मॅटर आहे. तो प्रश्न सोडवावा. उत्पन्न कसे येणार आहे? पैसा कसा खर्च करणार? हे सुध्दा दाखवायला पाहिजे. प्रशासनाने खुलासा करावा. त्यानंतर आमच्या शंका ऐकूण घ्याव्यात.

श्री.प्रमोद राठोड :नगर रचना विभागाचे रु.१०० कोटीचे उद्दीष्ट होते. रु.३० कोटी वसुल झाले मालमत्ता वसुली नाही. उत्पन्न वाढविणे प्रशासनाचे काम आहे. कर्ज काढल्यानंतर तुट कशी भरून काढणार आहे. उद्दिष्ट पुर्ण करावे. पगार पुरती वसुली होत असेल तर योग्य नाही. या कामासाठी जो निधी लागतो राज्य शासनाकडे मागवावा. नारेगाव येथे कचरा प्रोसेस करणेसाठी रु.५० कोटी लागणार आहे. असे होत असेल तर कामे होणार कशी? प्रत्येक विभागाने त्याची वसुली करायला पाहिजे. विनंती हा विषय थांबवावा. नवीन आयुक्त येतील. त्यांनी त्यावर अभ्यास करावा. शासनाकडून निधी घ्यावा. नागरीकांवर बोजा टाकू नये. मनपाच्या हिताचा निर्णय घ्यावा.

श्री.नासेर सिध्दीकी :स्वतंत्र बैठक आयोजित करावी.

श्री.राजगौरव वानखेडे :नवीन आयुक्त येतील त्यांचेकडून माहिती घ्यावी.

श्री.प्रमोद राठोड :पुर्वी रु.९८ कोटी दाखविले आता १० कोटी कमी झाले. चुकीची माहिती देतात का? कर्जाचा बोजा नागरीकांवर टाकू नये.

मा.महापौर :यानंतर या साठी सभा आयोजित केली जाईल. त्यात हा विषय व प्रश्न असतील. आता हा विषय स्थगित करण्यात येतो. सदस्यांनी ज्या सुचना केल्या

त्याची सर्व माहितीसह यावे. उत्पन्न व खर्चाचा ताळमेळ कसा असेल त्याची माहिती ठेवावी. पुढील सभेत निर्णय घेऊ

श्री.विकास जैन :शहरात ५०० स्क्वे.फुट पर्यत असलेल्या मालमत्ता किती आहे? त्यातून किती उत्पन्न येते? माहिती विचारलेली आहे ती देण्यात यावी.

मा.महापौर :स.सभागृहनेता यांनी मुंबई महापालिकेच्या धरतीवर ५०० ते ७०० स्क्वे.फुट पर्यंतच्या मिळकतीला कर माफी देता येईल का? असे विचारले आहे. या अगोदर पुर्ण डाटा कलेक्शन साठी प्रस्ताव ठेवला होता त्या नुसार किती मिळकती आहे किती टॅक्स लागलेला होता सर्व डाटा व येणारे उत्पन्न सर्व कलेक्ट करून सर्व माहिती प्रशासनाने पुढील सभेत सादर करावी. जो की, त्यावर योग्य निर्णय घेता येईल.

**ठराव:-**

प्रस्तुत प्रस्ताव पुढील सभेत सविस्तर माहितीसह सादर करावा.

**विषय क्रमांक ३९४:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिकेचे जे चतुर्थश्रेणी कर्मचारी महापालिका निवासस्थानात राहत आहेत. त्यांच्या वेतनातुन एकूण दरमहा १० टक्के कपात होते. साधारणतः रुपये ५०००/- ची कपात होते. या व्यतिरिक्त विद्युत देयक व पाणीपट्टी संबंधिताला वेगळी भरणा करावी लागते. सदरील निवासस्थानाची अवस्था अत्यंत वाईट आहे. गरीब लोक आहेत. महागाई मुळे त्यांच्या जीवनात त्यांचे स्वत:चे कधीच हक्काचे घरे होऊ शकत नाही. त्यामुळे त्यांची परिस्थिती समजुन घ्यावी.

करीता, चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांना महानगरपालिकेतर्फे पर्यायी जागा शासनाच्या घरकुल योजनेतुन उपलब्ध करून देण्यात यावी.

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**सुचक:-**श्री.जहागिरदार मोहम्मद अय्युब गुलाम जिलानी,

**अनुमोदक:-**श्री.नितीन दशरथ साळवी श्रीमती खान सायरा बानो अजमल.

मा.महापौर : प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेचे जे चतुर्थश्रेणी कर्मचारी महापालिकेच्या निवासस्थानात राहतात त्या निवासस्थानांची अवस्था अत्यंत वाईट असल्याने सदरील कर्मचाऱ्यांना महानगरपालिकेतर्फे पर्यायी जागा शासनाच्या घरकुल योजनेतुन उपलब्ध करून देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ३९५:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.५५, भवानी नगर, औरंगाबाद या वॉर्डमध्ये औरंगाबाद महानगरपालिकेचे आरोग्य केंद्रासमोरील खुल्या जागेवर अतिक्रमण होत असल्याने व सदरची जगा विनावापर पडून असल्याने सदर ठिकाणी जागा भाडेतत्वावर मिळणेसाठी ओम मजुर सहकारी संस्था यांनी मागणी केली आहे. सदर जागेवर संस्था सामाजिक उपक्रमा संबंधाने कार्यकरणार असल्याने सदरची खुली जागा संस्थेस भाडेतत्वावर दिल्यास त्यापासुन महानगरपालिकेस आर्थिक उत्पन्न मिळेल व महानगरपालिकेची जागा अतिक्रमण मुक्त होईल.

करीता, महानगरपालिका आरोग्य केंद्रा समोरील जागा संस्थेस महानगरपालिकेच्या अटी शुर्तीनुसार भाडेतत्वावर देण्यासाठीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.मनोज आसाराम बल्लाळ **अनुमोदक:-**श्री.गोकुळसिंग संपतसिंग मलके
मा.महापौर : प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.५५, भवानी नगर येथील औरंगाबाद महानगरपालिकेचे आरोग्य केंद्रासमोरील खुली जागा ओम मजुर सहकारी संस्थेस महानगरपालिकेच्या अटी व शुर्तीनुसार भाडेतत्वावर देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ३९६ :-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.५५, भवानी नगर, औरंगाबाद या वार्डामध्ये महानगरपालिकेचे न.भु.क्र.८९१५ खुली जागा असून सदर जागा ओम साई महिला बचत गट या संस्थेस सदरची खुली जागा मा.सर्वसाधारण सभेने दि.२०.०२.२०१५ रोजी ठराव क्र.७५३ नुसार ओम साई महिला बचत गट या संस्थेस प्रतिमाह रु.१०००/- प्रमाणे भाडे आकारणी करून सदर खुली जागेसाठी इतर खर्च संस्थेने करण्याच्या अटीस अधिन राहून भाडेतत्वावर देणे बाबत ठराव मंजुर झालेला आहे. त्याआधारे माझ्या वॉर्डातील भवानी नगर येथील न.भु.क्र.८९१५ ही खुली जागा ओम साई महिला बचत गट, औरंगाबाद या संस्थेस प्रतिमाह रु.१०००/- प्रमाणे भाडे आकारणी करून संस्थेस अटी अधिन राहून भाडेतत्वावर देण्यात यावे. सदरची संस्था ही सामाजिक उपक्रम राबवत असल्याने व समाजासाठी सतत कार्यरत असल्याने संस्थेचे कार्य बघता सदरची खुली जागा भाडेतत्वावर देण्यासाठीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.मनोज आसाराम बल्लाळ **अनुमोदक:-**श्री.गोकुळसिंग संपतसिंग मलके
मा.महापौर : प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.५५, भवानी नगर येथे महानगरपालिकेचे न.भु.क्र.८९१५ ही खुली जागा सर्वसाधारण सभा दि.२०.०२.२०१५ ठराव क्र.७५३ अन्वये ओम साई महिला बचत गट, औरंगाबाद या संस्थेस प्रतिमाह रु.१०००/- प्रमाणे भाडे आकारणी करून मनपाच्या अटी व शर्तीस अधिन राहून भाडेतत्वावर देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ३९७:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.५५, भवानी नगर, औरंगाबाद या वार्डामध्ये महानगरपालिकेचे व्यापारी संकुल जेव्हा पासून बांधले तेव्हा पासून त्यामधील दुकाने रिक्त असून त्यापासून महानगरपालिकेस कोणत्याही प्रकारचे उत्पन्न मिळत नाही. त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे. सदरच्या व्यापारी संकुलातील गाळे भाडेतत्वावर दिल्यास त्यापासून महानगरपालिकेस आर्थिक उत्पन्नाचा स्त्रोत निर्माण होईल व त्यावर होणारा देखभाल दुरुस्तीच्या खर्चाची बचत होईल. त्यामुळे सदर व्यापारी संकुलातील गाळे आईसाहेब स्वंयसेवी महिला बचत गट या संस्थेस देण्यात यावे. सदरच्या व्यापारी संकुलातील गाळे भाडेतत्वावर देण्यासाठीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.मनोज आसाराम बल्लाळ **अनुमोदक:-**श्री.नितीन दशरथ साळवी
मा.महापौर : प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.५५, भवानी नगर येथे महानगरपालिकेच्या व्यापारी संकुलातील गाळे आईसाहेब स्वंयसेवी महिला बचत गट या संस्थेस महानगरपालिकेच्या अटी व शर्तीस अधीन राहून भाडेतत्वावर देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ३९८:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.८२, अंबिकानगर अंतर्गत असलेल्या विकास कामाचे लेखाशिर्ष खालील प्रमाणे बदलण्याकरीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | जुने लेखाशिर्ष | नविन लेखाशिर्ष |
|---|---|---|
| १ | वॉर्ड क्र.८२, अंबिकानगर, मुकूंदवाडी (गाव) येथे लक्ष्मीमाता मंदिर समोरील मोकळ्या जागेवर सभागृह बांधणे.GBR-Ward-06 P.No.44,Sr.No.2(र.रु.१० लक्ष) | वॉर्ड क्र.८२, अंबिकानगर अंतर्गत संतोषीमाता नगर येथे ड्रेनेज लाईन टाकणे. (र.रु.१० लक्ष) |

**सुचक:-** श्री.भाऊसाहेब उत्तमराव जगताप **अनुमोदक:-**श्री.मनोज आसाराम बल्लाळ

मा.महापौर : प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.८२, अंबिकानगर अंतर्गत खालील प्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | जुने लेखाशिर्ष | नविन लेखाशिर्ष |
|---|---|---|
| १ | वॉर्ड क्र.८२, अंबिकानगर, मुकूंदवाडी (गाव) येथे लक्ष्मीमाता मंदिर समोरील मोकळ्या जागेवर सभागृह बांधणे.GBR-Ward-06 P.No.44,Sr.No.2 (र.रु.१० लक्ष) | वॉर्ड क्र.८२, अंबिकानगर अंतर्गत संतोषीमाता नगर येथे ड्रेनेज लाईन टाकणे. (र.रु.१० लक्ष) |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ३९९:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्रीमती प्रतिभा बाबुराव आंबेकर या शिक्षीका म्हणुन नगर परिषद जालना मध्ये सन १९९४ पासून कार्यरत आहेत. त्यांचे पती श्री.लक्ष्मण सर्जेराव कुऱ्हे हे सुशिलादेवी देशमुख विद्यालय, औरंगाबाद येथे शिक्षक या पदावर कार्यरत आहेत. श्रीमती प्रतिभा बाबुराव आंबेकर यांची नियुक्ती मराठी माध्यम खुल्या प्रवर्गातून झालेली आहे.

त्यांनी पती-पत्नी एकत्रीकरण अंतर्गत नगर परिषद जालना येथून औरंगाबाद महानगरपालिकेत शिक्षिका या पदावर काम करण्यासाठी शिक्षण विभागात अर्ज देऊन बदलीची मागणी केलेली आहे. करीता त्यांची बदली जालना येथून औरंगाबाद महानगरपालिकेत करणे बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.राजगौरव हरिदास वानखेडे **अनुमोदक:-**श्री.शिवाजी भाऊसाहेब दांडगे

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, नगर परिषद, जालना येथे कार्यरत असलेल्या शिक्षिका श्रीमती प्रतिभा बाबुराव आंबेकर यांना पती-पत्नी एकत्रीकरण अंतर्गत नगर परिषद जालना येथून औरंगाबाद महानगरपालिकेत शिक्षिका या पदावर सामावून घेण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४००:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पातील खालील कामे करण्यासाठी आर्थिक तरतुद करण्यात आलेली होती. सदरील कामातून काही रक्कम शिल्लक असल्याने लेखाशिर्ष बदलाचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | वळती कामाचे नाव | करावयाच्या कामाचे नाव |
|---|---|---|
| ०१ | वॉर्ड क्र.४०, गणेशनगर अंतर्गत जलवाहीनी टाकणे. र.रु.३५.०० लाख एससीआर वॉर्ड नं.५ पान क्र.४४ अनुक्रमांक-०२ | वॉर्ड क्र.४० गणेशनगर अंतर्गत विविध ठिकाणी पेव्हर ब्लॉक बसविणे.र.रु.१७ लाख. |

**सुचक:-**श्री.मकरंद माधवराव कुलकर्णी **अनुमोदक:-**श्रीमती मिना रामदास गायके
मा.महापौर : प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.४०,गणेशनगर अंतर्गत सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पातील खालील विकास कामाचे लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | वळती कामाचे नाव | करावयाच्या कामाचे नाव |
|---|---|---|
| ०१ | वॉर्ड क्र.४०, गणेशनगर अंतर्गत जलवाहीनी टाकणे. र.रु.३५.०० लाख एससीआर वॉर्ड नं.५ पान क्र.४४ अनुक्रमांक-०२ | वॉर्ड क्र.४० गणेशनगर अंतर्गत विविध ठिकाणी पेव्हर ब्लॉक बसविणे.र.रु.१७ लाख. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४०१:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.८४, ज्ञानेश्वरी कॉलनी या भागातील विकास कामे खालील दर्शविलेल्या कामाचे लेखाशिर्ष बदलण्यात यावे.

करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| जुने कामाचे नाव | नवीन कामाचे नाव |
|---|---|
| वॉर्ड क्र.८४, ज्ञानेश्वरी कॉलनी अंतर्गत श्री.पांचाळ यांच्या घरापासून ते चिंचेच्या झाडापर्यंत पुर्नडांबरीकरण करणे. Ward-06-Spill P.No.102 र.रु. १३,५४,७७७/- | १. त्याऐवजी वॉर्ड क्र.८४ श्री.पाटील यांच्या घरापासून ते जिल्हा मध्यवर्ती बँकेपर्यंत सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणे. अंदाजपत्रकीय र.रु.१३,५४,७७७/-अंदाजपत्रकीय र.रु.१३,५४,७७७/- |

**सुचक:-**श्री.कमलाकर शामराव जगताप **अनुमोदक:-**श्री.मनोज आसाराम बल्लाळ
मा.महापौर : प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.८४, ज्ञानेश्वरी कॉलनी येथे खालील दर्शविलेल्या विविध विकास कामाचे लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| जुने कामाचे नाव | नवीन कामाचे नाव |
|---|---|
| वॉर्ड क्र.८४, ज्ञानेश्वरी कॉलनी अंतर्गत श्री.पांचाळ यांच्या घरापासून ते चिंचेच्या झाडापर्यंत पुर्नडांबरीकरण करणे.Ward-06-Spill P.No.102 | १. त्याऐवजी वॉर्ड क्र.८४ श्री.पाटील यांच्या घरापासून ते जिल्हा मध्यवर्ती बँकेपर्यंत सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणे. अंदाजपत्रकीय |

| | |
|---|---|
| र.रु. १३,५४,७७७/- | र.रु.१३,५४,७७७/-अंदाजपत्रकीय<br>र.रु.१३,५४,७७७/- |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४०२:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मौजे, मुकूंदवाडी स.न.५९ व ६० मधील सिडकोने वितरीत केलेल्या प्लॉटच्या वसाहतीचे नामकरण "श्रीकृष्णनगर सिडको" असे करण्यात यावे.

करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.भाऊसाहेब उत्तमरराव जगताप **अनुमोदक:-**श्री.खान अय्युब म.हुसेन खान

मा.महापौर : प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मौजे मुकूंदवाडी स.न.५९ व ६० मधील सिडकोने वितरीत केलेल्या प्लॉटच्या वसाहतीचे "श्रीकृष्णनगर सिडको" असे नामकरण करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४०३:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, नागरीकांच्या मागणीनूसार व त्यांच्या सोयी करीता खालील तक्त्यातील लेखाशिर्षक करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेचे मंजूरीस्तव सादर.

| जूने लेखाशिर्षाचे नांव | पान.क्र.व रक्कम | नविनलेखाशिर्षाचे नांव | अं.क्र.व रक्कम |
|---|---|---|---|
| वॉर्ड क्रं. १०८ हमालवाडा अंतर्गत आतेफ खॉन यांच्या घरापासुन ते वसिम खॉन यांच्या घरापर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणे. | शहरी भागात पूर्ण डांबरीकरण करणे. GBR-Ward-08-P.No.-60 अ.क्रं.७-रक्कम१७ लाख | वॉर्ड क्रं १०८ अंतर्गत हमालवाडा विविध ठिकाणी ट्रिमिक्स कॉंक्रीटींग करणे | रक्कम १३ लाख. |
| वॉर्ड क्रं १०८ हमालवाडा अंतर्गत आतेफ खॉन यांच्या घरापासून ते वसिम खॉन यांच्या घरापर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणे. | शहरी भागात पूर्ण डांबरीकरण करणे. GBR-Ward-08-P.No.-60 अ.क्रं ७- रक्कम १७ लाख | वॉर्ड क्रं १०८ अंतर्गत सिल्क मिल कॉलनी येथे विविध ठिकाणी पेव्हर ब्लाक दुरुस्ती व नविन बसविणे. | रक्कम २ लाख |
| वॉर्ड क्रं १०८ प्रभागामध्ये रस्त्यांचे पूर्ण डांबरीकरण करणे. | शहरी भागात पूर्ण डांबरीकरण Ward-08-Spill P.No. 146 अं.क्र ७-रक्कम ११ लाख ७७ हजार. | वॉर्ड क्रं १०८ सिल्क मिल कॉलनी अंतर्गत रोडलगत पाथवे तयार करणे. | रक्कम ११ लाख ७७ हजार. |

**सुचक:-** श्रीमती मुल्ला सलीमा बेगम खाजोद्दीन **अनुमोदक:-** श्री.विजय साईनाथ औताडे

मा.महापौर : प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.१०८ अंतर्गत खालील तक्त्यातील लेखाशिर्षक बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| जूने लेखाशिर्षाचे नांव | पान.क्र.व रक्कम | नविनलेखाशिर्षाचे नांव | अं.क्र.व रक्कम |
|---|---|---|---|
| वॉर्ड क्रं. १०८ हमालवाडा अंतर्गत आतेफ खॉन यांच्या घरापासुन ते वसिम खॉन यांच्या घरापर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणे. | शहरी भागात पूर्ण डांबरीकरण करणे. GBR-Ward-08-P.No.-60 अ.क्रं.७-रक्कम१७ लाख | वॉर्ड क्रं १०८ अंतर्गत हमालवाडा विविध ठिकाणी ट्रिमिक्स कॉंक्रीटींग करणे | रक्कम १३ लाख. |
| वॉर्ड क्रं १०८ हमालवाडा अंतर्गत | शहरी भागात पूर्ण | वॉर्ड क्रं १०८ अंतर्गत सिल्क मिल | रक्कम २ |

| | | | |
|---|---|---|---|
| आतेफ खॉन यांच्या घरापासून ते वसिम खॉन यांच्या घरापर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणे. | डांबरीकरण करणे. GBR-Ward-08-P.No.-60 अ.क्रं ७- रक्कम १५ लाख | कॉलनी येथे विविध ठिकाणी पेव्हर ब्लाक दुरुस्ती व नविन बसविणे. | लाख |
| वॉर्ड क्रं १०८ प्रभागामध्ये रस्त्यांचे पूर्ण डांबरीकरण करणे. | शहरी भागात पूर्ण डांबरीकरण Ward-08-Spill P.No. 146 अं.क्र ७- रक्कम ११ लाख ७५ हजार. | वॉर्ड क्रं १०८ सिल्क मिल कॉलनी अंतर्गत रोडलगत पाथवे तयार करणे. | रक्कम ११ लाख ७५ हजार. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४०४:-(सर्वसाधारण सभा दिनांक ९-२-२०१८ मधील रद्द केलेला विषय क्र.३१६)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.४६, नवाबपुरा अंतर्गत मनपा शाळा चेलीपुरा-५ व जिन्सी येथील मनपा शाळा या दोन्ही शाळांचे एकत्रिकरण करून एकाच ठिकाणी दोन्ही शाळा भरविण्याचा मानस आहे. त्यासाठी रणछोडदास गिरणी समोर शाळेच्या इमारतीचे काम प्रगतीपथावर आहे. त्यामुळे पुढील सत्रात या ठिकाणी शाळा सुरू होईल.

तसेच चेलीपुरा-५ मनपा शाळा ही ७० वर्ष जुनी असून सदर इमारत ही जिर्ण झालेली आहे. सदरील शाळा ही लोडबेरींगची असल्यामुळे केव्हाही पडू शकते. त्यामुळे सदरील शाळा तोडून त्या ठिकाणी अभ्यासिका व वाचनालय बांधण्यात यावे. यासाठी सर्वसाधारण सभा दिनांक १५.११.२०१७ ठराव क्र.६५ अन्वये र.रु.७०.०० लक्ष वळती करण्यात आलेले आहे.

करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.खान फेरोज मोईनुद्दीन **अनुमोदक:-**श्री.गजानन रामकिसन बारवाल

श्री.फेरोज खान :मागिल वेळेस शाळेचा विषय घेतला नाही. तो मंजूर करावा.

शिक्षणाधिकारी :चेलीपूरा क्र.५ ही शाळा नवीन ठिकाणी १ कि.मीटरच्या आत शिफ्ट करता येईल.

मा.महापौर :मागिल वेळेस सांगण्यात आले की, शाळा तोडता येणार नाही

शिक्षणाधिकारी :त्यावेळी मुलाची व्यवस्था कुठे करायची निर्णय झालेला नव्हता. आता प्रश्न सॉल्व्ह झाला.

मा.महापौर :आता तो प्रस्ताव मंजूर करण्यास हरकत नाही. हा विषय मंजूर

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.४६, नवाबपुरा, चेलीपुरा-५ मनपा शाळा ही ७० वर्ष जुनी असून सदर इमारत ही जिर्ण झालेली असल्याने व सदरील शाळा ही लोडबेरींगची असल्याने केव्हाही पडू शकते. त्यामुळे सदरील शाळा इमारत पाडण्यासाठी नियमाप्रमाणे कार्यवाही अनुसरावी. त्या ठिकाणी अभ्यासिका व वाचनालय बांधण्यासाठी सर्वसाधारण सभा दिनांक १५.११.२०१७ ठराव क्र.६५ अन्वये सदरील कामास र.रु.७०.०० लक्ष वळती करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ४०५:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्रमांक ११०, मयुरबन कॉलनी अंतर्गत पोद्दार स्कुल ते गादियाविहार पृथ्वीराजनगर पर्यंत कॉंक्रीट रस्ता तयार करण्याचे काम एस.डी.दौंडे कन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करण्यात येत असून सदरील काम पोद्दारस्कुल ते त्रिशरण चौकापर्यंत पूर्ण झाले असून या कामासाठी ठेवण्यात आलेली आर्थिक तरतुद संपली असल्याने त्रिशरण चौकापासून ते पृथ्वीराजनगर पर्यंत उर्वरीत २५% रस्ता पावसाळा सुरु होणेपूर्वी करणे अत्यंत आवश्यक आहे.

सदरील मंजुर नियोजित रस्ता पुर्ण करण्यासाठी आणखी ५० लक्ष रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. या कामासाठी रक्कम रुपये ५०.०० लक्षचा वाढीव खर्च मंजुरीस्तव तसेच या कामासाठी सन २०१८-२०१९ च्या अर्थसंकल्पात वाढीव तरतुद करणेसह पावसाळ्यापूर्वी सदरील काम पुर्ण करण्याच्या दृष्टीकोनातून या कामासाठी अल्प मुदतीची निविदा काढणेसाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती स्मिता दिगंबर घोगरे

**अनुमोदक:-** श्रीमती ज्योती सुनिल नाडे, श्री.गजानन भानुदास मनगटे

मा.महापौर :ऐनवेळीचा प्रस्ताव मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्रमांक ११०, मयुरबन कॉलनी अंतर्गत पोद्दार स्कुल ते त्रिशरण चौकापासुन पृथ्वीराजनगर पर्यंत उर्वरीत २५% कॉंक्रीट रस्ता करणे अत्यंत आवश्यक असल्याने यासाठी रु.५० लक्ष वाढीव तरतुद करण्यास व या कामासाठी अल्पमुदतीची निविदा काढण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

मा.महापौर :कार्यक्रम पत्रिका क्रमांक ०७ मधील जे सदस्यांचे लेखाशिर्ष बदलाचे व अंदाजपत्रकाचे प्रस्ताव मंजूर.

या बरोबरच राष्ट्रगीताने सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषीत केले.

दिलीप दत्तात्रय सुर्यवंशी
नगर सचिव
महानगरपालिका औरंगाबाद